RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
# शिव वाणी
बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २२ वे | अंक २० | सोमवार दि.२६ मे २०२५ | Mo.9422748792/ 9822628521 | पाने : ४ | किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-22 | Issue -20 | MONDAY DT.26 MAY 2025 | RNI- MAHMAR2003/14666 | PAGES - 4 | PRICE - 3 RUPEES

## बारामतीत पावसाचा कहर! नीरा डावा कालवा फुटला

पुणे : बारामती आणि दौंड परिसरात झालेल्या अतिमुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. रविवारी झालेल्या पावसामुळे बारामतीतील नीरा डावा कालवा फुटला. त्यामुळे प्रचंड वेगाने पाणी पालखी महामार्गावर आले आणि काटेवाडी-भवानीनगर हा रस्ता बंद करण्यात आला. तसेच बारामतीतील दीडशेहून अधिक घरात पाणी शिरलं. त्यामुळे प्रशासन अलर्ट मोडवर असून एनडीआरएफची दोन पथकं या परिसरात दाखल झाली आहेत. पुणे जिल्ह्यात रविवारी एकूण २२.५ मिलिमीटर पाऊस पडलेला आहे. इंदापूर आणि बारामती तालुक्यातील विविध गावांमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्यामुळे घरात पाणी शिरले आहे. बारामतीतील साधारणपणे दीडशेहून अधिक घरात पाणी शिरल्याचे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# शिंदेंच्या युवासेनेने नव्हे तर बाजीरावांच्या चव्हाणांनी वाटल्या स्कार्पिओ ?

## ज्यांना स्कार्पिओ वाटल्या ते युवा सेनेचे पदाधिकारी ही नाहीत विपुल पिंगळे यांचा पक्षांतर्गत सणसणाटी आरोप..!



बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेले बाजीराव चव्हाण मुंबईत गेले आणि एकनाथराव शिंदे यांचे विश्वासू कर्मचारी झाले. कालांतराने शिंदे साहेबांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद मिळाले. आणि बीड जिल्ह्यातील चव्हाणांचे हे बाजीराव अचानक राजकीय पटलावर आले.



सामाजिक कार्य करता करता ते राजकीय झोकात आले. आणि थेट बीड विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उमेदवार म्हणून चर्चेत देखील आले. विधानसभा निवडणुका झाल्यानंतर त्यांची राजकीय चर्चा थंड झाली होती. आता विधानसभा नंतर आगामी येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या तोंडावर त्यांनी युवा सेनेच्या निष्ठावंत काही निवडक कार्यकर्त्यांना सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट साहेब यांच्या हस्ते स्कार्पिओ गाड्या वाटप केल्या. वाटप केलेल्या या चार स्कार्पिओ गाड्या वादाच्या भवऱ्यात आता अडकल्या आहेत. ज्यांना स्कार्पिओ देण्यात आली ते युवा सेनेचे कुठलेही पदाधिकारी नाहीत. केवळ बाजीरावांचे निष्ठावंत कर्मचारी आहेत, असा थेट आरोप पक्षांतर्गतच जबाबदार असलेले मराठवाडा विभागाचे निरीक्षक विपुल पिंगळे यांनी केल्याने शिंदेंच्या शिवसेनेतील युवा सेनेमध्ये राज्यात खळबळ उडाली आहे. याची गांभीर्याने दखल घेऊन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे नेते एकनाथराव शिंदे रोखठोक आणि गांभीर्याने निर्णय घेतील का ? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र राज्याच्या राजकीय पटलावर एकनाथजी शिंदे साहेब यांच्या रूपाने एक मुत्सदी, कणखर, आणी जनसामान्य नागरिकांमधून आलेले नेते लाभले आहेत. एकनाथजी शिंदे साहेब यांनी शिवसेना पक्षाचे महाराष्ट्र राज्यातील तळागळातील नागरिकांच्या प्रश्नावर आवाज उठवून जनसामान्यांची सेना म्हणजे एकनाथराव शिंदे यांची शिवसेना असा विश्वास संपादन करत आपली वाटचाल सुरूच ठेवली आहे. तर दुसरीकडे युवासेने मधे कार्य सुद्धा महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात सरस असेच आहे. युवा सेनेच्या माध्यमातून

(उर्वरीत पान २ वर)

# वनविभाग कडून जमीन न मिळाल्यामुळे सैन्य बटालियनचे स्थलांतर

### धारूरच्या पर्यावरणाची वाताहत: गतवर्षीचे झाडे जोपासण्यासाठी बारा सैनिकच

धारूर ।प्रतिनिधी

तालुक्याला मिळालेल्या वन थर्टी सिक्स मिलिटरी बटालियनचे ७५ टक्के जवान संभाजीनगरला स्थलांतरित झाल्याने तालुक्यात 'झाडे लावा, झाडे वाढवा' या मोहिमेला मोठा फटका बसला आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे ही बटालियन पूर्ण क्षमतेने धारूरमध्ये स्थिरावू शकली नाही, ही दुर्दैवाची बाब आहे.



धारूरला मिळालेल्या वन थर्टी सिक्स मिलिटरी बटालियनला दरवर्षी २०० हेक्टर गायरान जमीन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी प्रशासनाची होती.गतवर्षी घागरवाडा आणि धारूर पोलीस ठाण्याच्या पाठीमागील पडीक जमीन वृक्ष लागवडीसाठी देण्यात आली होती .दोन्ही ठिकाणी दोन लक्ष वृक्षांची लागवड करण्यात आली होती .लागवड


(उर्वरीत पान २ वर)

# रेल्वे कामाच्या नावाखाली रस्त्याचे वाजले तीनतेरा

वडवणी ।प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील उपळी ग्रामपंचायत हद्दीमध्ये येत असलेल्या सावंत वस्ती वरील रस्त्याचे रेल्वेच्या कामामुळे तीनतेरा वाजले आहे. ब्राह्मणाथ तांडा ते सावंत वस्ती येथील रस्त्याची अत्यंत वाईट अवस्था असतांना गत वर्षी प्रत्येक लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्याला या रस्त्याबाबतीत संघीतल असता येथे कसल्याही प्रकारची कोणी दखल घेतली नाही त्यामुळे येथील लोकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत होते त्याच वेळी एक रुग्ण रुग्णालयात उपचारासाठी घेऊन

### अवजड वाहन गेल्याने स्वखर्चाने बनवलेला रास्ता झाला चिकलमय



जाण्यासाठी कसल्याच प्रकारचा वाहन जात नसल्याने येथील लोकांना घरातील चारपाई (बाजावर) रुग्णाला घेऊन ब्राह्मणाथ तांडा येथेन रुग्णाला रुग्णालयात हलविण्यात आले होते. त्यानंतरही वेळोवेळी लोकप्रतिनिधीला येथील परिस्थिती दाखवूनही काही दखल न घेतल्याने व रस्ता तात्काळ बनवण्याची गरज असल्याने येथील रहिवासी असलेल्या लोकांनी स्वखर्चाने निधी जमा करून येथील रस्ता दुरुस्त करून घेतला होता परंतु सध्या रेल्वेचे कामे चालू असून रेल्वेचा १४

(उर्वरीत पान २ वर)

# डॉ 'काजवा' प्रकाशन' निर्मित व प्राचार्य शिवाजी बापुराव धुंगरड लिखीत मायंबा ने मुंबई पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या थाटात संपन्न

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

दिनांक २५ मे रोजी एम जी एम विद्यापिठ छत्रपती संभाजी नगरच्या आइनस्टाईन सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एम जी एम न्ये सर्वेसर्वा अंकुशराव कदम (बाबूराव कदम) हे होते. तर कार्यक्रमाचे उद्घाटक मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोतमजी खेडेकर साहेब होते. यावेळी मंचावर गोरक्ष गर्जे (सहसंचालक तंत्रशिक्षण विभाग, नाशिक)भाऊसाहेब राजळे (उद्योजग छत्रपती संभाजी नगर),धनंजय गुडसुरकर (ज्येष्ठ साहित्यीक, उदगीर) हे लाभले.

कार्यक्रमाची सुरुवात मासाहेब जिजाऊच्या प्रतिमेच पूजन करुन जिजाऊ वंदनाने झाली. यानंतर मान्यवरांचे स्वागत सपन्न झाले. ज्येष्ठ



साहित्यीक गुडसुरकर यांनी पुस्तकाचे समीक्षन करतांना प्राचार्य डॉ. शिवाजी धुंगरड यांचे आत्मकथन ग्रामीण विद्यार्थ्यौना प्रेरणा देणारे आहे असे मत व्यक्त केले तर पुरुषोत्तम खेडेकर यांनी प्राचार्य शिवाजी धुंगरड यांचा खडतर प्रवास वाखण्ण्याजोगा आहे असे मत व्यक्त केले आणि अध्यक्षीय समारोपात अंकुशराव (बाबुराव कदम) यांनी प्राचार्य श्री शिवाजी

(उर्वरीत पान २ वर)

# दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीनेच प्रसिद्ध आहे- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्हा कलाकारांची भूमी असून या जिल्ह्यात अनेक नामवंत व्यक्तींनी आपल्या कार्यातून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवलेला आहे काही दुर्दैवी घटना वगळल्या तर बीड जिल्हा चांगल्या गोष्टीने देखील प्रसिद्ध आहे. कचरवाडी सारख्या डोंगर कुशीत जन्मलेल्या एका तरुणाने चित्रपट क्षेत्रात भरभरून यश मिळवले असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

बीड जिल्ह्यातील कचरवाडी येथील रहिवासी असलेल्या डॉ.महेशकुमार वनवे यांच्या वामा लढाई सन्मानाची या चित्रपटाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते तनिष्का चित्रपटगृहात करण्यात आले. यावेळी आ.विजयराजे पंडित, माजी आ.बदामराव पंडित, अॅड.उषाताई दराडे, सुभाष सारडा, अनिल जगताप, विनोद मुळूक, ज्योतीताई मेटे, अरुण डाके, विलास बडगे, सुधाकर मिसाळ, नितीन धांडे, संगीता धसे, नवनाथ शिराळे, अभय कोटेचा, गौतम खटोड,



शुभम धूत, सुहास पाटील आदींची उपस्थिती होती. यावेळी ज्ञानेश्वर वनवे आणि लोकाशाच्या वतीने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लोकाशाचे संपादक विजय बंब यांनी केले तर डॉ.महेशकुमार वनवे यांनी मनोगत व्यक्त करताना आतापर्यंत भोजपुरी सिनेमात काम केले पण मराठी चित्रपट म्हणून आज प्रथमच पदार्पण करत आहे.

(उर्वरीत पान २ वर)

# शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

### मान्सूनपूर्वच्या प्रवासाची गती लवकरच कमी होणार असल्यामुळे राज्यात पावसात घट होणार आहे

मुंबई ।प्रतिनिधी

या वर्षी मान्सूनचा प्रवास वेगाने सुरु असल्यामुळे तो २५ मे रोजी दक्षिण कोकणात दाखल झाला आहे, जे सामान्य तारखेपेक्षा १० दिवस आधीच आहे. मात्र २७ मे पासून मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होणार असल्यामुळे राज्यातील हवामानात लवकरच मोठे बदल दिसून येतील. सध्याच्या अंदाजानुसार २७ मे पासून राज्यातील हवामान हळू हळू कोरडे होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ देखील होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे, आणि किमान ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज आहे. यामुळे किमान ५ जूनपर्यंत तरी राज्यातील बहुतांश भागात मान्सून दाखल होण्याची आणि मान्सूनच्या पावसाची शक्यता दिसत नाही. या दरम्यान देशातील इतर भागात सुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो. या वर्षी राज्यातील अनेक भागात दमदार मान्सून पूर्वीचा वादळी पाऊस पडला आहे. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. हवामान कोरडे होणार असल्यामुळे जर पेरणीची घाई केली तर शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# शिवसैनिकांनो, तुम्ही पक्ष संघटन मजबूत करा तुम्हाला बळ देण्याचे काम मी करेल- ना. संजय शिरसाट

### मंत्री ना. संजयजी शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा शिवसेनेची आढावा बैठक संपन्न

बीड ।प्रतिनिधी

शिवसेना पक्षात कधी जात पाहून काम केलं जात नाही व शिवसैनिक कधीच जात धर्म बघून जनतेचा कामासाठी पुढे जात नाहीत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांचे संस्कार आपल्यावर झालेले आहेत. तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब यांची स्वाभिमानी विचारधारा घेऊन आपण सर्व शिवसैनिक पुढे वाटचाल करत आहोत. त्यामुळे शिवसैनिकांनी जात-धर्म न बघता केवळ माणूस बघून सर्व सामान्य जनतेचे काम करा, जनतेच्या मनावर तुम्ही अधिराज्य गाजवाल आणि जनता तुम्हाला डोक्यावर घेऊन मिरवेल. तुम्ही पक्ष संघटन मजबूत करा तुम्हाला बळ देण्याचे काम मी करेल. असे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते संजयजी शिरसाट साहेब यांनी बीड जिल्हा शिवसेनेच्या आढावा बैठकीमध्ये शिवसैनिकांना संबोधित केले. तसेच उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करत स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत दिशा स्पष्ट केली.

दि. २४ रोजी दुपारी २ : ०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील हॉटेल ग्रँड यशोदा येथे महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते मा. ना. श्री. संजयजी शिरसाठ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेनेची अत्यंत महत्वपूर्ण आढावा बैठक मोठया उत्साहात संपन्न झाली. ही बैठक म्हणजे बीड जिल्ह्यात शिवसेना संघटनेच्या मजबुतीचा ठोस पुरावा ठरली. या बैठकीमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक आणि जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी मंत्री महोदय ना. शिरसाट साहेबांचे बीड जिल्हा शिवसेनेच्या



वतीने जंगी स्वागत करत मोठ्या थाटामाटात सत्कार केला. यानंतर मंत्री ना. शिरसाट साहेबांनी उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना संबोधित केले. तसेच या बैठकीसाठी उपस्थित असणारे शिवसेना मराठवाडा विभागीय सचिव अशोकजी पटवर्धन साहेब आणि शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांनी स्थानिक स्वराज्य निवडणुकांबाबत मार्गदर्शन केले. बैठकीचे प्रास्ताविक नवनिर्वाचित शिवसेना तालुकाप्रमुख संतोष जाधव यांनी केले तर बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आपल्या भाषानातून जिल्ह्याचा आढावा मांडला. दरम्यान बैठकीत मंत्री महोदय ना. शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. तसेच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्या महिला आघाडी अध्यक्षा जयश्रीताई वाघमारे व बाळासाहेब खेडकर तंटामुक्ती अध्यक्ष खामगाव गेवराई यांनी मंत्री महोदय शिरसाट यांच्या उपस्थितीमध्ये शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, युवा सेना मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे, युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवासेना बीड लोकसभा निरीक्षक सागर

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

# संपादकीय

## 'ईडी'चे सूडचक्र

सर्वोच्च न्यायालयांसह विविध उच्च न्यायालयांनी समज दिल्यानंतरही सक्तवसुली संचालनालयाचा (ईडी) अगोचरपणा थांबण्यास तयार नाही, हेच सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या खंडपीठाने 'ईडी'वर ओढलेल्या ताशेऱ्यांमधून दिसून येत आहे. तमिळनाडूतील मद्य परवाना गैरव्यवहार प्रकरणात 'ईडी'ने राज्य पणन महामंडळावरच केलेल्या कारवाईबाबत न्या. गवई आणि न्या. ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. 'ईडी' सर्व सीमा ओलांडत असून, संघराज्य संकल्पनेचेही उल्लंघन करीत आहे,' अशा शब्दांत कानउघाडणी करून खंडपीठाने 'ईडी'च्या कारवाईला स्थगिती दिली. एखाद्या प्रकरणात कारवाई करत असलेल्या यंत्रणेलाच लक्ष्य करण्याच्या प्रयत्नांना यामुळे शह बसला आहे.

गेली दहा वर्षे हे प्रकरण तमिळनाडूमध्ये गाजत आहे. तेथील राज्य पणन महामंडळामार्फत राज्यातील मद्याच्या घाऊक व किरकोळ विक्री व्यवहारांचे नियंत्रण केले जाते. या संदर्भातील विविध व्यवहार आणि निविदा प्रक्रियेत सुमारे एक हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप आहे. त्यामध्ये मद्य परवान्यांसाठी बनावट कागदपत्रे सादर करणे, वाहतूक टेंडरमध्ये कागदपत्रांची फेरफार करून ठरावीक व्यक्तींनाच फायदा मिळवून देणे, खरेदीच्या बनावट नोंदी आणि बनावट (शेल) कंपन्यांची स्थापना, यांबरोबरच मोठ्या प्रमाणात लाचखोरी झाली असून, त्यात राजकारणी व नोकरशहांचाही समावेश असल्याचे आरोप करण्यात येतात. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर राज्य सरकारने महामंडळामार्फत फौजदारी कारवाई सुरू केली आणि सुमारे ४१ गुन्हे दाखल करण्यात आले होते. ही कारवाई सुरू असतानाच 'ईडी' ने या प्रकरणात हस्तक्षेप करून दोन महिन्यांपूर्वी तमिळनाडूत महामंडळाच्या मुख्यालयासह विविध अधिकारी आणि मद्य व्यावसायिकांवर छापे घातले.

राज्य सरकारकडून कारवाई सुरू असताना केंद्राच्या अखत्यारीतील 'ईडी'ने शिरकाव करून कारवाई करणाऱ्या महामंडळावरच 'मनी लाँडरिंग' कायद्यानुसार कारवाईचा बडगा उगारण्यास राज्य सरकार आणि महामंडळाने आक्षेप घेतला होता. आता सर्वोच्च न्यायालयाने कडक ताशेरे ओढून या कारवाईला स्थगिती दिल्याने 'ईडी' पुन्हा आरोपांच्या भोवऱ्यात अडकली आहे. पुढील वर्षीच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणावरून तेथे राजकारण पेटल्यास नवल नाही. भारतीय जनता पक्षाचे तेथील प्रमुख नेते के. अण्णामलाई यांनी तेथील उत्पादन शुल्कमंत्री व्ही. सेंतिल बालाजी हेच या गैरव्यवहाराचे सूत्रधार असल्याचा आरोप केला असून, राज्य सरकारने पुरावे नष्ट करू नयेत, म्हणून 'ईडी'ची कारवाई व्हावी, अशी मागणी केली होती. आता या प्रकरणी राज्य सरकारला बदनाम करण्याचा भाजपचा प्रयत्न फसल्याचा आरोप सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघमने केला आहे.

काही दिवसांपूर्वीच तमिळनाडूत विधेयके अडवणाऱ्या राज्यपालांनाही सर्वोच्च न्यायालयाने फटकारले होते. बिगर भाजपशासित राज्ये आणि केंद्र सरकारच्या संबंधांमध्ये गेल्या काही वर्षांत कमालीचा कडवटपणा निर्माण झाला आहे. त्याबरोबरच विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच 'ईडी'कडून 'पीएमएलए'चा गैरवापर करण्यात येत असल्याचा आरोप पूर्वीपासून आहे. संसदेत दिलेल्या माहितीनुसार, सन २०१९ ते २४ या काळात 'मनी लाँडरिंग'च्या ९११ तक्रारी करण्यात आल्या. त्यापैकी ६५४ खटल्यांचा निकाल लागला असून फक्त ४२, म्हणजे फक्त ६.४२ टक्के प्रकरणांमध्ये दोषसिद्धी झाली आहे. दोषसिद्धीच्या या अत्यल्प प्रमाणामुळे या कारवायांमागे विरोधकांची बदनामी आणि राजकीय 'ब्लॅकमेलिंग'च्या आरोपांना बळ मिळते.

# भविष्यकाळात गणेश उगले यांच्या राजकीय जडणघडणीत मी सदैव पाठीशी राहील - ना. संजय शिरसाट

बीड ।प्रतिनिधी

गणेश उगले हे गेल्या अनेक वर्षापासून शिवसेनेमध्ये निष्ठेने काम करत आहेत.रोज सामाजिक कामामध्ये व्यस्त राहून लोकांच्या अडचणीत धावणारा हा कार्यकर्ता आहे. ग्रामीण भागामध्ये त्यांनी शिवसेनेच्या माध्यमातून अनेक माणसे जोडले आहेत. त्यांना पक्षाने मार्केट कमिटीचे संचालक केले आहे. आणि उपजिल्हाप्रमुखांची जबाबदारी दिली आहे.पण भविष्यामध्ये त्यांना मोठी जबाबदारी मिळो आणि लोकांच्या सेवेसाठी सत्तेतले पद मिळो यासाठी मी सदैव शिवसेना उपजिल्हाप्रमुख गणेश उगले यांच्या पाठीशी राहील अशा शुभेच्छा राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेनेचे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार संजय शिरसाट साहेब यांनी दिनांक २४ मेच्या बीड जिल्ह्याच्या दौऱ्यामधील गणेश उगले यांच्या बीड येथील शिवगड निवासस्थानी दिलेल्या सदिच्छा भेटी प्रसंगी दिल्या.

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री नामदार संजय शिरसाट साहेब हे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या तिरंगा रॅलीला व शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, शिवसेना जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर, युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण तसेच शिवसेनेचे उप जिल्हाप्रमुख गणेश उगले यांनी आयोजित केलेल्या बीड शहरातील विविध कार्यक्रमाच्या निमित्ताने व समाज कल्याण विभागाच्या आढावा बैठकीसाठी दिवसभर बीड शहरात उपस्थित होते. या दौऱ्यामध्ये नामदार संजय शिरसाट साहेब यांनी गणेश उगले यांचा मुलगा विश्वजीत यांच्या नुकत्याच १३ मे रोजी संपन्न झालेल्या विवाह व हळदी समारंभास उपस्थित राहून न शकल्याने आज २४ मे रोजी शासकीय दौऱ्यावर असताना त्यांच्या बीड येथील शिवगड निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या सदिच्छा भेटी प्रसंगी नामदार संजयजी शिरसाट साहेब यांच्या समवेत शिवसेना संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, मराठवाडा सचिव अशोकराव पटवर्धन साहेब, युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर, मा. जिल्हाप्रमुख अँड .चंद्रकांत आप्पा नवले यांच्यासह सर्व तालुका शहर व जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमास अखिल भारतीय वारकरी मंडळाचे जिल्हाध्यक्ष व उद्योजक हरिदास भाऊ जोगदंड ,



उद्योजक प्रशांत जोशी मनसे जिल्हा सचिव छत्रपती संभाजी नगर,शिवसेना गेवराई विधानसभा प्रमुख रमेश कानडे, शिक्षक नेते सुनील कुर्लेकर सर, गणेश राव तोडेकर, अनुरथ भाऊ मस्के, शिक्षक नेते जीवन बागलाने सर, तालुकाप्रमुख बाळासाहेब काळे, भगवान मस्के, अशोक मस्के, मराठा महासंघाचे भागवत मस्के, कॉन्ट्रॅक्टर संदीप नवले, धर्मराज आंधळे, वैजनाथ निर्मळ, गोरख बांडे, स्वप्निल आबूज, सुरज उगले, लक्ष्मण घोलप, प्रवीण उंदरे, राजेंद्र देवतर्शे, बालाजी गवते, बाबुराव जाधव, शहादेव धापसे, विनोद उगले, स्वामी काका, कुलकर्णी काका, प्रताप खांडे, शंकर कानडे, करण कानडे, ऋषी काळे, यांच्यासह शेकडो शिवसैनिक व मित्रपरिवार उपस्थित होते.

# यवतमाळ येथे लोकमत सरपंच अवॉर्ड : २०२५ या पुरस्कार वितरण सोहळ्यात व ग्रामीण

## विकासासाठी जीवापाड कार्य करणाऱ्या नेतृत्वाचा सन्मान करून, त्यांच्याशी मंत्री संजय राठोड यांनी संवाद साधला

मुंबई ।प्रतिनिधी




गावाचा सरपंच म्हणजे फक्त ग्रामपंचायतीचा प्रमुख नव्हे, तर तो संपूर्ण गावाच्या आशा-अपेक्षांचा केंद्रबिंदू असतो. रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण अशा विविध मूलभूत गरजांवर काम करताना प्रत्येक सरपंचाला अनेक अडचणींना सामोरं जावं लागतं. तरीही तो चिकाटीने, दूरदृष्टीने आणि नेतृत्वगुणांनी आपल्या गावात परिवर्तन घडविण्यासाठी प्रामाणिक मेहनत घेत असतो.

ग्रामपंचायत ही आपल्या लोकशाहीची पहिली पायरी असून, तिच्यावरच खऱ्या अर्थाने गावाच्या आणि पुढे राष्ट्राच्या उभारणीचं मोलाचं काम उभं राहतं. गावातील वाड्या-तांड्यांच्या समस्या ओळखून, शासनाच्या योजना शेवटच्या नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचं जबाबदारीचं काम सरपंच करत असतो.

आजच्या सरपंचाने केवळ योजनाची अंमलबजावणी करण्यापुरता मर्यादित न राहता एक विचारवंत, मार्गदर्शक म्हणून पुढे यावे, सर्वांगीण विकास साधताना लोकांमध्ये एकजुटीचा विचार आणि माझे गाव, माझी जबाबदारी ही भावना जागृत करावी. तेव्हा खऱ्या अर्थानं ग्रामविकासाच्या चळवळीला अधिक बळ मिळेल.

आजचा पुरस्कार ही समाप्ती नव्हे, तर नव्या कार्याची सुरुवात मानून प्रत्येक सरपंचाने अधिक जोमाने कार्यरत व्हावं, ही अपेक्षा व्यक्त करतो, आणि सर्वोत्कृष्ट सरपंच पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या सर्व सरपंचाचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. लोकमत माध्यम समूहाने ग्रामीण भागातील नेतृत्वाला समाजासमोर सन्मानाने उभं करून त्यांच्या कार्याला जी प्रतिष्ठा दिली, त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार मानतो.आजचा पुरस्कार हा केवळ गौरव नसून, राज्यभरातील हजारो सरपंचांसाठी एक प्रेरणास्त्रोत आहे. त्यांच्या कार्यातून समाजात सकारात्मक बदल घडावा, नव्या नेतृत्वाची पिढी घडावी, आपल्या गावाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकजुटीनं, समर्पणाने आणि पारदर्शकतेने काम करत राहावं, अशा सर्वांना मंत्री संजय राठोड यांनी शुभेच्छा दिल्या.




## कृषिभूषण शिवराम घोडके यांचा मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते

# महाराष्ट्र महा गौरव पुरस्काराने सन्मान

बीड ।प्रतिनिधी

प्रगतशील शेतकरी, सेंद्रिय व नैसर्गिक शेतीचा प्रचार प्रसार करणारे तसेच महाराष्ट्र शासनाचा कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शिवराम घोडके यांचा पुण्यात राज्याचे तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र महा गौरव पुरस्कार देवून समान्मानित करण्यात आले. यावेळी ग्रामविकास आणि पंचायत राजमंत्री जयकुमार गोरे, आयुष्यमान भारत महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कृषिभूषण शिवराम घोडके यांना कृषी क्षेत्रातील योगदानाबद्दल महाराष्ट्र महा गौरव पुरस्कार २०२५ जाहिर झाला होता. या पुरस्काराचा वितरण सोहळा रविवार दि. २५ मे रोजी सकाळी ११ वाजता पुण्यातील जे डब्ल्यू मॅरिएट हॉटेल येथे मोठ्या थाटात संपन्न झाला. डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना, महाराष्ट्रच्या वतीने महाराष्ट्र महा गौरव २०२५ राज्यस्तरीय पुरस्कारासाठी बीडचे प्रगतशील शेतकरी, सेंद्रिय नैसर्गिक शेतीचा देशभर प्रसार व प्रचार करणारे तसेच महाराष्ट्र शासनाचा कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शिवराम घोडके यांची निवड करण्यात आली होती. शिवराम घोडके हे प्रयोगशील व प्रगतशील शेतकरी म्हणून आदर्श कार्य करत आहेत. नव्या पिढीतील नवा दृष्टिकोन घेऊन परिश्रम करणारा शेतकरी म्हणून शिवराम घोडके यांच्याकडे पाहिले जाते. सेंद्रिय शेती क्षेत्रातील त्यांचे कार्य ग्रामीण महाराष्ट्रासाठी दिशादर्शक आहे. ग्रामविकासातील महत्वाच्या योगदानाबद्दल त्यांचा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते व ग्रामविकास आणि पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, आयुष्यमान भारत महाराष्ट्र समिती अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला. शिवराम घोडके यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पान १ वरून...

### शिंदेंच्या युवासेनेने ...

प्रत्येक जिल्ह्यातील तरुण वर्ग जोडला गेला असून एकनाथजी शिंदे साहेब आणी श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वर विश्वास ठेवत शिवसेना आणी युवासेनेला कार्यकर्ते जोडले जात असतांनाच बीड जिल्ह्यात परवा भव्य तिरंगा रॅली निमित्त महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजयजी सिरसाट साहेब यांच्या उपस्थिती मध्ये अजबच प्रकार बघायला मिळाला. आणी तो अजब प्रकार म्हणजे युवा सेनेच्या आणी विशेषःतहा बाजीराव चव्हाण यांच्या चार निष्ठावंत युवासेना पदाधिकारी यांना स्कॉर्पिओ गाड्या गिफ्ट देण्यात आल्या.आणी त्या सुद्धा सामाजिक न्याय मंत्री संजयजी सिरसाट साहेब यांच्या हस्ते.दुसरी गोष्ट ही कि आपलेच हात आणी आपलीच पाठ थोपटून घेण्याचा प्रकार युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्याकडून करण्यात आलेला दिसून आला. कारण महाराष्ट्र राज्यात जशी युवकांच्या हृदयात युवा सेना आहे तशी ती बीड जिल्ह्यातील तरुणांच्या हृदयात देखील आहे. परंतु ही युवा सेना तरुणांच्या हृदयात पोहचवनारे खरे शिलेदार हे दुसरेच आहेत. हे संपूर्ण जिल्ह्याला माहिती आहे. मात्र बीड जिल्ह्यात युवा सेना पोहोचवण्याचे काम फक्त मीच केले अशी पाठ बाजीराव चव्हाण स्वतःच थोपटून घेत आहेत. अशी चर्चा बीड जिल्ह्यातील जनता यानिमित्ताने करत आहे.माझे बीड जिल्ह्यात शेकडो निष्ठावंत पदाधिकारी आहेत असे दाखवून देण्याचा केविलवाणा प्रयत्न परवाच्या स्कॉर्पिओ गाड्या गिफ्ट देण्याच्या प्रकारात कळून चुकला. युवा सेना वाढवणारे खरे शिलेदार वेगळेच.मात्र माझ्या मुळेच युवा सेना जिल्ह्यात वाढली, पोहचली, युवा सेनेचा विस्तार झाला, आणी हे सगळं माझ्या मूळे आणी माझ्या या निष्ठावंता मुळेच शक्य झाले. त्यामुळे माझ्या या अमुक तमुक निष्ठावंतांना वरिष्ठाच्या हस्ते स्कॉपीओ गिफ्ट दिल्या अशी सुंदर जाहिरातबाजी दिसून आली. माझ्या सोबत किंवा माझ्या मागे रहा म्हणजे मि तुम्हाला गाड्या गिफ्ट देऊ शकतो असे आमिष नकळत युवकांना बाजीराव चव्हाण यांच्याकडून देण्यात आल्याचे नागरिकां मधून बोलले जाऊ लागले आहे. तसेच महाराष्ट्र राज्यात असे शेकडो युवा सेनेचे निष्ठावंत पदाधिकारी आहेत, मग बाजीराव चव्हाण हे या सर्वाना स्कॉर्पिओ गाड्या गिफ्ट देणार आहेत काय ? परवाच्या या अजब प्रकारा मूळे बीड जिल्ह्यातील नागरिक म्हणू लागले आहेत कि ज्या पदाधिकारी यांना गाड्या खरच वाटल्या ते युवासेना पदाधिकारी आहेत ? का फक्त तरुण आणी नेता खुश होण्यासाठी नुसत्याच लाडया-गोड्या आहेत.असा गंभीर आरोप युवासेना कार्यकारिणी सदस्य तथा संप्रुण मराठवाडा निरीक्षक विपुल बाळासाहेब पिंगळे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे केला आहे. यामुळे खऱ्या अर्थाने शिंदेंच्या युवा सेनेत आता राज्यात खळबळ उडाली आहे.

### रेल्वे कामाच्या....

नंबरचा पूल बनवण्याचे कामे चालू आहे म्हणून त्या कामाला लागणारे साहित्य नेण्यासाठी अवजड वाहनाचा उपयोग होत असल्याने व सतत पाऊस पडत असल्याने येथील स्वखर्चाने बनवलेला रास्ता हा अत्यंत खराब झाला असून येथील शेतकरी व रहदारी करणाऱ्या नागरिकांना रेल्वेच्या कामामुळे पुन्हा तेच दिवस बघण्याची वेळ आली आहे त्यामुळे येथील नागरिकांमध्ये संताप निर्माण होत असून या भागातील खासदार व आमदार या लोकप्रतिनिधीनी काही अनर्थ घडण्यापूर्वी याकळे तात्काळ लक्ष देऊन हा रस्ता दुरुस्त करून घ्यावा अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

हा रस्ता बीड परळी मार्गाला जोडणारा मुख्य रस्ता असून आमच्या वस्तीवरील महिलांना प्रसूतीसाठी, रुग्णांना उपचारासाठी व शेतकऱ्यांच्या शेतामध्ये खत,बी बियाणे व सर्व शेतीला लागणारी साहित्य नेण्यासाठी एकमेव रास्ता असल्याने सर्व शेतकरी व नागरिकांनी स्वखर्चाने हा रस्ता बनवला होता परंतु रेल्वेच्या कामासाठी भर पावसात अवजड वाहन गेल्यामुळे हा रस्ता पुन्हा चिकलमय झालं असून येथील शेतकऱ्यांना व रहिवाश्यांना रहदारीसाठी रस्ताच नाही त्यामुळे लोकप्रतिनिधी यांनी तात्काळ लक्ष द्यावे. यापूर्वी स्वखर्चाने आम्ही रास्ता केला होता परंतु येथील लोकांची गरीब परिस्थिती असून रेल्वेच्या गुत्तेदारांनाही लक्ष देऊन हा रस्ता करून घ्यावा.

### वनविभाग कडून जमीन...

करण्यात आलेल्या झाडांची चांगल्या प्रकारे जगली आहेत .सध्या ही झाडी चार ते पाच

पान १ वरून...

फुटापर्यंत वाढलेली आहे .यामध्ये कडुलिंब , बाभूळ, खैर, वड , जांभूळ यासह अनेक झाडांचा समावेश आहे .दरवर्षी झाडांची लागवड करण्यात येणार होती . परंतु, त्यांना हवी ती जमीन उपलब्ध जिल्हा प्रशासनाकडून उपलब्ध न झाल्यामुळे ७५ टक्के जवान संभाजीनगरला शिफ्ट झाले आहेत. यामुळे धारूर तालुक्याला 'हिरवेगार' करण्याचे स्वप्न भंगले आहे . धारूर शहर आधीच मागासलेले आहे . त्यात नैसर्गिक पर्यावरणाला चालना देणारी ही संधी वाया गेल्याने पर्यटनालाही मोठा फटका बसणार आहे. शासनाकडून मिळालेली ही मदत स्वीकारता न येणे हे दुर्दैव आहे.पुन्हा ही बटालियन धारूरमध्ये येण्यासाठी आणि पर्यावरणाचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्व संबंधितांनी एकत्रितपणे आणि गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. अन्यथा, धारूर तालुका हिरवागार होण्यापासून कायमचा वंचित राहील .

यावर्षी आम्हाला फॉरेस्ट कडून बीड जिल्ह्यात वन जमीन दिली नाही .संभाजीनगरला जमीन मिळाल्यामुळे ७५ टक्के सैनिक स्थलांतरित झाले आहेत .धारूर तालुक्यातील घागरवाडा व परिसरातील गतवर्षी करण्यात आलेले रोपण सांभाळण्यासाठी दहा ते बारा सैनिक धारूर येथे ठेवण्यात आलेले आहेत .

-अमित प्रभू ,कॅप्टन वन थर्टी सिक्स ईको बटालियन

### दुर्दैवी घटना वगळल्या ....

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे खूप मोठे सहकार्य मला लाभले असून मी मुंबईत गेलो तेव्हा तिथे अण्णांनीच मला आधार दिला माझ्या या यशाच्या मागे माझ्या घरातून पाठबळ असून यापुढे मराठी चित्रपट निर्मितीवर आपला भर असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी चित्रपट रिलीज झाल्यानंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी देखील अर्धा तास चित्रपटाचे परीक्षण केले.

### डॉ 'काजवा' प्रकाशन' ...

धुंगरड सारख्या एम जी एम. च्या गुणी विद्यार्थ्यांच्या माध्यमातून समाजा साठी विधायक उपयोग करु असे पुरुषोत्म खेडेकर यांना आश्वासित केले.शेवटी प्राध्यापक सुरेंद्र धुंगरड यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

तसेच वैज्ञानिक दृष्टीकोनातून एका समस्याचे २४ उपाय असतात, त्यातील एक अचूक उपाय निवडणारा म्हणजे प्राचार्य शिवाजी धुंगरड हे होय असे प्रतिपादन गोरक्ष गर्ज यांनी केले. कार्यक्रमाची सांगता मोठ्या उत्साहाने संपन्न झाली.

### शिवसैनिकांनो, तुम्ही पक्ष...

बहिर, महिला आघाडीच्या सह संपर्कप्रमुख अलकाताई डावकर, महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर, युवा सेना जिल्हाप्रमुख रविराज बडे, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, युवा सेनेचे गणेश शिराळे, ओबीसी वी जयंती सेनेचे जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांनी बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आढावा बैठकीचे सूत्रसंचलन प्रतिक कांबळे यांनी केले.

शिवसेना नवनियुक्त पदाधिकारी...

अमोल दिगंबर जाधव - शिवसेना उपजिल्हाप्रमुख बीड ग्रामीण, संतोष किसनराव जाधव - शिवसेना तालुकाप्रमुख बीड तालुका, ज्ञानोबा जनार्धन गोंडे - शिवसेना तालुकाप्रमुख वडवणी तालुका, गजानन दामोदर कदम - शिवसेना शहरप्रमुख बीड शहर, हनुमंत काशिनाथ शिंदे - शिवसेना शहरप्रमुख वडवणी शहर, सुनील अंकुशराव गवते - जिल्हा सहसंघटकपबीड विधानसभा, केशव बाबुराव घिघे - जिल्हा सहसंघटक माजलगाव विधानसभा. नारायण आप्पासाहेब शिंदे- शिवसेना उपजिल्हाप्रमुख गेवराई, उध्दव ज्ञानेश्वर मडके - शिवसेना तालुकाप्रमुख गेवराई, नवनाथ राजेंद्र गवते - शिवसेना विधानसभा प्रमुख गेवराई, मुकेश अंकुशराव महाजन - शिवसेना शहरप्रमुख गेवराई, सुनिल मोटे -शिवसेना शहरसंघटक गेवराई या सर्व नवनिर्वाचित शिवसेना पदाधिकाऱ्यांना मंत्री ना. संजयजी शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते नियुक्ती पत्रक देण्यात आले.



# मिनाक्षी देवकते यांचा सोलापुरात प्रकाश शेंडगे यांच्या हस्ते अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मान

बीड ।प्रतिनिधी

येथील बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा मिनाक्षी देवकते / डोमाळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना माजी आमदार प्रकाश अण्णा शेंडगे, व्याख्याते यशपाल भिंगे यांच्या हस्ते सोलापुरात महाराष्ट्र अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बीड येथील बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष मिनाक्षी देवकते / डोमाळे या विविध सामाजिक कार्यात सक्रीय आहेत. महिलांसाठी त्या कराटे, लाटी-काटी प्रशिक्षण देत आहेत. मेंढपाळ बांधवांना त्या नेहमीच मदत करत आहेत. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन ए. डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महाराष्ट्र अहिल्या रत्न पुरस्कार त्यांना देण्यात आला. या पुरस्काराचे वितरण रविवार २५ मे रोजी सोलापूर येथील निर्मिती लॉन्स येथे मोठ्या थाटात संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार प्रकाश आण्णा शेंडगे हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्याख्याते यशपाल भिंगे, अशोक गोरड, निमीषा वाघमोडे, डॉ. सचिन मोटे आदींची उपस्थिती होती. मिनाक्षी देवकते यांचा अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मान झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

शिव वाणी SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी म्हणजेच साप्ताहिक



# शिवसेनेचे बळ वाढविण्यासाठी संघटीतरित्या कार्य करा

## सामाजिक न्यायमंत्री संजय सिरसाट यांच्या उपस्थितीत बीडमध्ये शिवसेनेची आढावा बैठक

बीड ।प्रतिनिधी

शिवसेनेचे काम वर्षाचे बारा महिने ३६५ दिवस सुरु असते याचा अनुभव जनतेने घेतलाय. यामुळे भविष्यात शिवसेनेची पक्षबांधणी, विस्तार व संघटन याचबरोबर पक्षाला बळकटी प्राप्त करण्याच्या हेतूने सर्वांनी संघटितरीत्या कार्य करावे असे आवाहन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट यांनी केले.

सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट हे शनिवारी बीड जिल्हा दौऱ्यावर आले होते. यावेळी बीड जिल्हा शिवसेना कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. प्रारंभी ऑपरेशन सिंदूरमध्ये शहिर झालेल्या भारतीय सैनिकांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली. बैठकीस मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर, महिला जिल्हाप्रमुख चंद्रकलाताई बांगर, युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण ,मराठवाडा निरीक्षक विपुल पिंगळे आदी उपस्थित होते. मंत्री सिरसाट म्हणाले की, शिवसेनेत जातीपातीला थारा नाही. शिवसेनेचे काम वर्षाचे बारा महिने ३६५ दिवस सर्व जातीधर्माला सोबत घेऊन सुरु असते. त्यामुळेच एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध पक्षातील लोकप्रतिनिधी, पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करत आहेत. सत्तातरानंतर आलेले सरकार जनतेच्या मनातील सरकार असून एकनाथ शिंदे- देवेंद्र फडणवीस, अजित



पवार यांनी ओरिजनल युतीचे सरकार आणले आहे. केंद्र आणि राज्य मिळून सर्वसामान्य जनतेचा अपेक्षित विकास केला जाईल व बीड जिल्ह्यातील सर्व प्रलंबित प्रश्न मिळून सोडवले जातील. प्रत्येक पक्ष आपली ताकद वाढवत असतो. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका महायुतीच्या माध्यमातूनच लढविल्या जातील. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होऊ शकते. यामुळे आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकांमध्ये शिवसेनेचे वर्चस्व राहण्यासाठी शिवसैनिकांनी तीनही जिल्हाप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली नियोजनबध्द कामाला लागावे असे आवाहन सिरसाट यांनी केले. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला चोख उत्तर दिले. लष्करी तळासह, दहशतवाद्यांचे अड्डे उदध्वस्त करण्यात आले. भारतीय सैन्यदलाने शौर्य गाजवले. यासाठी ठिकठिकाणी तिरंगा यात्रा निघत आहेत. याप्रश्नी कोणी उठसूठ राजकारण करू नये, असेही सिरसाट म्हणाले. बैठकीला अविनाश जाधव, अलकाताई डावकर, युवा सेना लोकसभा अध्यक्ष सागर बहिर, युवा सेना जिल्हाप्रमुख सुजित शिंदे, रविराज बडे व गणेश शिराळे सह शिवसेनेचे सर्व उपजिल्हाप्रमुख जिल्हा संघटक, तालुकाप्रमुख, विधानसभा प्रमुख ,शहरप्रमुख, अंगीकृत संघटनांचे पदाधिकारी आजी-माजी लोकप्रतिनिधी व शिवसैनिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाट यांची संगिताताई चव्हाण यांच्या निवासस्थानी भेट



बीड ।प्रतिनिधी

आज बीडच्या दौऱ्यावर आलेले सामाजिक न्याय मंत्री मा.ना.श्री.संजयजी शिरसाट यांनी संगिताताई चव्हाण यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. दि.६ रोजी अहिल्यानगर - पुणे महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात जखमी झालेल्या शिवसेनेच्या मराठवाडा संपर्कप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या सदस्य अँड. संगीताताई चव्हाण यांच्या निवासस्थानी सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाट यांनी भेट घेऊन तब्येतीविषयी विचारपूस केली.

अपघातामध्ये जखमी झालेल्या शिवसेना उपजिल्हाप्रमुख शेख फर्जाना, पत्रकार विशाल गणोरकर यांच्या दुखापतीची माहिती यावेळी मंत्री महोदयांनी

आत्मीयतेने घेतली. या भेटीच्यावेळी शिवसेनेचे मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण, जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक, स्वप्निल गलधर हे उपस्थित होते.

# हिंदू मुस्लिम विद्यार्थ्यांना जातींचे प्रमाणपत्र तात्काळ द्या

## सा.न्याय मंत्री शिरसाट यांना डॉ.लक्ष्मण जाधव,खुर्शीद आलम यांचे निवेदन

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट साहेब हे आज बीडच्या दौऱ्यावर आले होते. या निमित्ताने बीड जिल्हा हिंदू मुस्लिम ओबीसी भटके विमुक्त जाती जमातींच्या वतीने डॉ.लक्ष्मण जाधव आणि मा.सभापती खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात एका शिष्टमंडळाने मंत्री महोदयाची भेट घेऊन निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सध्या दहावी व बारावी चे निकाल जाहीर झालेले आहेत व तसेच येत्या अवघ्या काहीच दिवसात निट व नेटचे ही निकाल जाहीर होणार आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी, शिक्षण आदिची प्रवेश प्रक्रिया सुरु होणार आहे.ओबीसी समाजातील मुलांना पुढील शिक्षणासाठी ओबीसी जातीचे जात वैधता प्रमाणपत्र लागणार आहेत. असे असतानाही ओबीसी जातींचे अनेक फाईली प्रलंबित असून वेळेवर जातीचे वैधता प्रमाणपत्र न मिळाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ शकते. म्हणून विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ द्यावे.जात पडताळणी समिती अधिकारी यांनी पुर्ण वेळ कार्यालयात येऊन प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गी लावावेत. तसेच समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी शाळेत येऊन शाळा पोच जातीचे प्रमाणपत्र द्यावे, ज्यांच्याकडे अपुरे पुरावे असेल किंवा सक्षम अधिकारींना संशय वाटत असेल तर सक्षम अधिकाऱ्यांनी रजिस्ट्रेड सामाजिक ओबीसी संघटनांचे शिफारश पत्र गृहीत धरून जातीचे प्रमाणपत्र द्यावे. शहरालगतच्या व ग्रामीण भागातील हिंदू मुस्लिम ओबीसी भटके विमुक्त जाती जमातींच्या लोकांना त्यांच्या हक्काचे योजनांची माहिती देऊन लाभ



मिळवून द्यावे, अश्या विविध मागण्यांचे निवेदन आज सामाजिक न्याय मंत्री नामदार शिरसाट साहेब यांच्याकडे देण्यात आले आहे, यावेळी हिंदू मुस्लिम ओबीसी भटके विमुक्त जमातीचे जिल्हाध्यक्ष डॉ.लक्ष्मण जाधव शहराध्यक्ष तथा माजी सभापती खुर्शीद आलम,फारोक मन्यार,मोमीन अजहर,सैय्यद नविद,हकिम मन्यार सर,मोमीन सलीम,मनोज चव्हाण,जाकेर छप्परबंद,अशोक दुधाळ, सलाम सेठ,वजीर आत्तार,महेबुब इनामदार,अकसाद मंसुरी,हादी इनामदार,जमील बागवान,मोमीन वाजेद, समीर तांबोळी,लतिफ तडवी,विजय गायकवाड,मोमीन नसीर यांच्या सह हिंदू मुस्लिम ओबीसी जातीतील अनेक लोक उपस्थित होते, मंत्री महोदयांनी लक्षपूर्वक ऐकुन घेतल्याबद्दल शहराध्यक्ष खुर्शीद आलम यांनी मंत्री महोदयांचे आभार मानले आहे.

# स्वामी समर्थ दूध संस्थेच्या चेअरमन पदी सोमनाथ कासार तर व्हा. चेअरमनपदी सूर्यभान गोपाळे यांची निवड

संगमनेर खुर्द : प्रतिनिधी

संगमनेर तालुक्यातील निमगाव खुर्द येथील स्वामी समर्थ सहकारी दूध संस्थेच्या चेअरमन पदी सोमनाथ दामोदर कासार तर व्हा.चेअरमन पदी सूर्यभान गोपाळे यांची संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये एकमताने निवड करण्यात आली आहे. माजी महसूल मंत्री ना. बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी विकास मंडळाच्या वतीने स्वामी समर्थ दूध संस्था निमगाव खुर्द संस्थेच्या निवडणुकीमध्ये १२ जागेसाठी उमेदवार उभे करण्यात आले होते. या अत्यंत चुरशीच्या समजल्या जाणाऱ्या निवडणुकीमध्ये शेतकरी विकास मंडळाचे १२ पैकी११ उमेदवारांनी दणदणीत मिळवला आहे. विरोधी पॅनलचे एकच उमेदवार बाळासाहेब प्रभाकर गोपाळे हे



हे निवडून आले.आहेत.

(१) सोमनाथ कासार (२) सूर्यभान गोपाळे (३) नितीन कासार(४) अरुण गोपाळे (५) मच्छिंद्र कासार (६) ज्ञानेश्वर गोपाळे (७) दीपक गोपाळे (८) नागेश चंद्रमोरे ( बिनविरोध )(९) भागवत गोपाळे (१०) मंदा गोपाळे(११) मीना गोपाळे हे मोठ्या मताधिक्याने निवडून येत एक जागा बिनविरोध मिळाल्याने शेतकरी विकास मंडळाचे बहुमत होऊन दणदणीत विजय मिळवला आहे.

विरोधकांचा फक्त एक उमेदवार निवडून आल्याने विरोधकांचा या निवडणुकीमध्ये दारुण पराभव झाला आहे. सर्व संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये चेअरमन व्हा. चेअरम पदाच्या निवडणुकीमध्ये सोमनाथ कासार व सूर्यभान गोपाळे यांची एकमताने निवड करण्यात आली असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी एस.जी. गाडे यांनी घोषणा केली. यासाठी सर्व संचालक मंडळांनी एकमताने संमती देत चेअरमन व व्हा. चेअरमन पदाची निवड करण्यात आली. याप्रसंगी निमगाव खुर्द चे सरपंच धनराज गोपाळे, शेतकी संघाचे संचालक भास्कर गोपाळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मनीष गोपाळे, राहुल चंद्रमोरे, नानासाहेब कासार, गंगाधर कासार, भास्कर गोपाळे, सतीश कासार, राजेश गोपाळे, रवी गोपाळे, माजी सरपंच संदीप गोपाळे, गणपत गोपाळे, आबा कासार,पोपट कासार, राजू सूर्यभान, आणि सर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# देशसेवा हीच ईश्वरसेवा - आ. संतोष पाटील दानवे

## आमदार संतोष पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ जाफ्राबादेत तिरंगा सन्मान यात्रा संपन्न

जाफराबाद ।प्रतिनिधी

पहलगाम येथे झालेल्या भारतीय नागरिकांवरील भ्याड दहशतवादी हल्ल्याने संपूर्ण देश हळहळला परंतु देशाचे यशस्वी पंतप्रधान माननीय श्री नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने व भारतीय सैन्याने दहशतवादाचा समूळ नाश करण्यासाठी व हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या देशवासीयांच्या बलिदानाचा बदला घेण्यासाठी सुरू केलेले ऑपरेशन सिंदूर यशस्वी केले आणि भारतीय सैन्यांनी दिलेल्या प्रत्युत्तराने इतिहास रचला. त्या भारतीय सैन्याचे मनोबल वाढविण्यासाठी आपण सर्व देशवासीय भारतीय सैन्याच्या सोबत आहोत आणि आपणही देशसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीदवाक्य घेऊन कार्य करत राहणार असल्याचे प्रतिपादन आमदार संतोष पाटील दानवे यांनी टेंभुर्णी ते जाफ्राबाद तिरंगा सन्मान यात्रेच्या समारोपप्रसंगी बोलत असताना व्यक्त केले.

पुढे बोलताना आमदार दानवे म्हणाले की,भारतीय स्वाभिमानाचा



अभेद्य गड आणि देशाच्या सुरक्षेचे प्रतीक असलेल्या आपल्या सैन्यदलाने, आदरणीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांच्या निर्णायक नेतृत्वाखाली, देशद्रोही दहशतवाद्यांना सडेतोड प्रत्युत्तर दिले. 'ऑपरेशन सिंदूर' हे अत्यंत धाडसी व यशस्वी अभियान राबवले त्याबद्दल भारतीय सैन्याचा आणि पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांचा आपल्या सर्वांना सार्थ अभिमान असल्याचेही ते म्हणाले.यावेळी तिरंगा सन्मान यात्रेच्या निमित्ताने देशासाठी देशासाठी कर्तव्य बजावलेल्या आणि कर्तव्यावर असलेल्या आजी-माजी सैनिकांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला. यामध्ये जाफ्राबाद तालुक्यातील आजी माजी सैनिकांसह, हजारो देशभक्त या तिरंगा सन्मान यात्रेत सहभागी झाले होते.

# मोहखेडमध्ये गुणवंतांचा गुणगौरव सोहळ्यास उपस्थित रहा - संयोजन समिती

बीड/प्रतिनिधी

चला विद्यार्थी घडवूया, या टॅगलाईनखाली गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा गुणगौरव सोहळा धारुर तालुक्यात येत असलेल्या मोहखेड येथे गुरुवार (दि.२९) मे रोजी सकाळी १० वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ यांनी केले आहे. विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप पडावी, त्यांना त्यांच्या यशाचा योग्य मार्ग कळावा. यासाठी दरवर्षी इयत्ता १० वी, १२ वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले तर अध्यक्षस्थानी सत्यशोधक ओबीसी परिषदेचे अध्यक्ष संदीप उपरे असणार आहेत.प्रमुख पाहुणे म्हणून धारुरचे तहसीलदार श्रीकांत निळे, पोलीस निरीक्षक आनंत जाधव, उपप्राचार्य रमेश सोनटक्के, प्रा.रमेश सोनवळकर,डॉ.किरण चक्रे, वंचितचे उपजिल्हाध्यक्ष सचिन उजगरे, वंचितचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, धम्मपाल उघडे, ड.राजेश शिंदे, डीपीआय जिल्हाध्यक्ष नवनाथ कांबळे, मुख्याध्यापक संदिप कापसे, ड.तेजस वडमारे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित राहणार



आहेत.

नालंदा संघर्षभूमी, स्वाभिमानी राजरत्न युवामित्र मंडळ आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यास उपस्थित रहावे.असे आवाहन संयोजन समितीकडून करण्यात आले आहे.




# मिसाळवाडीत महादेव महाराज घुंगरड यांचे संगीत भजन संपन्न

मानूर ।प्रतिनिधी

मिसाळवाडी (ता. पाटोदा) येथील अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त प्रसिद्ध गायनाचार्य महादेव महाराज घुंगरड (निमगाव मायंबा) यांचे संगीत भजन उत्साही वातावरणात संपन्न झाले. या भजनासाठी मृदंगावर मृदंगाचार्य कृष्णा महाराज सातपुते व हार्मोनियमवर दिनकर महाराज खामकर यांनी उत्कृष्ट साथसंगत केली.संगीत भजनास गावातील तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहिले होते. संगीतमय वातावरणात हरिनामाचा गजर सुरू असतानाच उपस्थित भाविक भक्तगण मंत्रमुग्ध झाले.

# श्री विनायकराव विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

बीड ।प्रतिनिधी

शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत उज्वल यश मिळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शनिवार दिनांक २४ रोजी श्री विनायकराव माध्यमिक विद्यालयात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

नुकताच शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेमध्ये वैद्यकीनी येथील श्री विनायकराव माध्यमिक विद्यालयाचा १००% टक्के निकाल लागला. या विद्यालयातून २९ विद्यार्थी विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले आहेत. कु. जोगदंड सुजाता बबन ९३.४०% गुण घेऊन सर्वप्रथम आली. चि.बांगर विशाल त्रिंबक ९३% टक्के गुण घेऊन द्वितीय तर चि. बावणे पार्थ मधुकर



९२.२० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे.या शिवाय कु. बावणे अंकिता सिताराम हिने ९२%, कु. बाबर साक्षी सखाराम हिने ९०% गुण मिळवले. यांच्यासह शाळेच्या अनेक विद्यार्थ्यांनी चांगले गुण संपादन करत घवघवीत यश मिळवले. शाळेतील या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती पात्र कु.श्रेया चौरे व कु. प्रेरणा चौरे यांचा ही सत्कार शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गुणगौरव शनिवार दिनांक २४ मे रोजी एका शानदार कार्यक्रमात करण्यात आला. या सत्कार समारंभ प्रसंगी वैद्यकिन्हीचे सरपंच अतुल मकाळ, सोनेगाव येथील इंजिनियर संभाजी चौरे संस्था सचिव भागवत (अण्णा) आजबे संस्था अध्यक्ष बाजीराव (अण्णा) बांगर संस्था उपाध्यक्ष भाऊसाहेब भाऊ शिंदे, संचालक नारायण भाऊ वाघमारे व मधुकर बापू जगताप उपस्थित होते. या वेळी सरपंच यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम जिद्द, चिकाटी ,आणि आई-वडिलांच्या कष्टाची,परिस्थितीची जाणीव ठेवून सातत्याने अभ्यास केल्यास यश हमखास मिळते असे सांगत विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. इंजिनीयर संभाजी चौरे मार्गदर्शन करताना म्हणाले की ग्रामीण भागातील विद्यार्थी कठोर परिश्रम करतात आणि यशवंत होता हे अनेक स्पर्धा परीक्षेच्या निकालातून दिसून आले.त्यामुळे विद्यार्थ्यांनी त्यांचे मार्गदर्शन व आदर्श घेऊनच वाटचाल करावी असे म्हटले, दहावी नंतर पॉलिटेक्निकच्या माध्यमातून इंजीनियरिंगकडे येता येते व आपले करिअर उत्तम प्रकारे घडू शकते याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी प्रस्ताविक आजबे सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बांगर सर यांनी तर आभार श्री. मोरे सर यांनी मानले.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक श्री. बांगर सर, मकाळ सर, कोचाळे सर, आजबे सर, वळे सर, जिरेकर सर, मोरे सर, श्रीमती.कवडे मॅडम, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. यावेळी गावातील शिक्षण तज्ञ पालक आजी माजी विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या.

# मुलीसाठी माहेरचा दरवाजा कायम उघडा ठेवा - शामसुंदर महाराज सोन्नर

## अहिल्यादेवी होळकर त्रिजन्म शताब्दी कीर्तन महोत्सवाची सांगता

सिरसाळा ।प्रतिनिधी

स्त्रियांना योग्य संधी व स्वातंत्र्य मिळालं की त्या आपलं कर्तृत्व सिद्ध करतात. म्हणून मुलींच्या लग्नाची घाई न करता त्यांना ज्या क्षेत्रात शिक्षण, करियर करायचे असेल ते करू द्या. त्या नक्कीच यश मिळवतील असा विश्वास हभप शामसुंदर महाराज सोन्नर यांनी व्यक्त केला. मुलगी हे परक्याचं धन आहे ही भावना डोक्यातून काढून टाका आणि तिच्यासाठी माहेरचा दरवाजा कायम उघडा ठेवा असे आवाहनही त्यांनी सिरसाळा येथे केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिजन्म शताब्दीनिमित्त सिरसाळा येथे शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. त्याची सांगता शामसुंदर महाराज सोन्नर यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. त्या प्रसंगी ते



बोलत होते. यावेळी डॉ. हरिश्चंद्र वंगे, प्रभाकर वाघमोडे, माऊली गडदे, एड. अजय बुरांडे, भीमराव सातपुते, बाबुराव रुपनर,सुभाष सोळंके आदी मान्यवर उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते बंडू खांडेकर यांनी बहारदार सूत्र संचालन केले. तर सतीश काळे यांनी आभार मानले.

किर्तन महोत्सव यशस्वी करण्यासाठी बंडू खांडेकर, मुन्ना काळे, सतीश काळे, अशोक गलांडे, शिवाजी काळे, बाबासाहेब काळे, व्यंकटेश काळे, नितेश काळे, गोरख काळे, विठ्ठल वानरे, अशोक देवकते, शेंडगे सर, मदन वाघमारे आदींनी मोलाचे सहकार्य केले.

वारकरी रिंगण आणि मोटारसायकल रॅली

अहिल्यादेवी होळकर त्रिजन्म शताब्दीनिमित्त आयोजित केलेल्या कीर्तन महोत्सवाच्या समारोपानिमित्त सिरसाळा येथे मोटार सायकल रॅली आणि दिंडीचे आयोजन केले होते. दिंडी दरम्यान केलेल्या गोल रिंगणाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. रिंगणात तरुण कार्यकर्त्यांनी ताल धरला होता. हा आनंद डीजे पेशा किती तरी जास्त असल्याच्या भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या.

# अभाविपच्या ग्रामानुभुती शिबीरात विद्यार्थांना ग्रामीण संस्कृतीचे दर्शन

बीड ।प्रतिनिधी

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद व विकासार्थ विद्यार्थी जालना जिल्हा आयोजित ग्रामानुभुती शिबीर या शिबिरामध्ये पहिल्या दिवशी उद्घाटन सत्र पार पडले. यामध्ये अभाविपचे जिल्हाप्रमुख प्रा नाना गोडबोले , जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे , शिबिर प्रमुख लहू किंगरे , यांनी या सत्राचे उद्घाटन केले. जिल्हा संयोजक नवनाथ गव्हाणे यांनी प्रस्तावना केली तर या तीन दिवसाच्या शिबीरा मध्ये काय काय होणार आहे. अभाविप गेल्या ७६ वर्षापासून अविरतपणे शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये काम करत आहे.या शिबिरामध्ये सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सर्व सत्रामध्ये सहभाग घ्यावा व उत्साहाने या शिबिराचा आनंद घ्यावा असे प्रतिपादन प्रा नाना गोडबोले यांनी केले.

शिबीर प्रमुख लहू किंगरे यांनी ३ दिवसाच्या शिबिरामध्ये काय होणार आहे आणि व्यवस्था कशाप्रकारे असेल हे सांगितले व सूत्रसंचलन पवन नरवडे यांनी केले आणि भगवद् गीता अभ्यासक तुलजेस जी चौधरी यांनी त्यांच्या अमृतवाणीतून विद्यार्थ्यांना अत्यंत मोलाचे व समजेल असे सोप्या भाषेत भगवद् गीतेचा सार मांडला आणि विद्यार्थ्यांना नांगर तासातील इतिहासात सांगण्यात आला.




त्यानंतर ट्रेकिंगचा आनंद सुद्धा विद्यार्थ्यांनी मनमोहकपणे घेतला. वनभोजनाचा सुद्धा अनुभव यामध्ये विद्यार्थ्यांना आला.त्यानंतरचे सत्र प्रा डॉ रामेश्वर पाटील यांनी घेतले. भारत पाकिस्तान मधील युद्ध यामध्ये भारताने चालवले मिशन सिंदूर बद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्रा डॉ रामेश्वर पाटील म्हणाले की देशभक्ती ही सच्ची ईश्वर भक्ती है याचे लघु दर्शन मला आज या ग्रामानुभुती शिबिरामध्ये दिसत आहे अशाप्रकारे विविध सत्र खेळ , वादविवाद स्पर्धा , गीत गायन , असे वेगवेगळे कार्यक्रम या शिबिरात घेण्यात आले.

# लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर ।प्रतिनिधी

कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २५ मे, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ०८ जून, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

# गणेश वराडे यांना लोकसेवक पुरस्कार प्रदान



मुंबई ।प्रतिनिधी

गेल्या दहा, बारा वर्षापासून समाजकार्याच्या माध्यमातून सामाजिक कार्य, सर्वसामान्यांना न्याय देण्याचे कार्य करत असून अन्याय-अत्याचार, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रासह विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्याव्यक्तींच्या घेतलेली त्यांनी कार्याची दखल आहे. त्याचप्रमाणे आपल्या कार्याच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या मुला-मुलींची यशेगाथा घेऊन अनेकांना प्रेरित करण्याचे व ठाणे, मुंबई, उपनगरात समाज कार्याचे योगदान मोठ्या प्रमाणात असणाऱ्या व्यक्तिमत्व म्हणजे गणेश नारायण वराडे यांनी आपल्या समाज कार्याला सुरुवात केली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन एकता सन्मान सोहळा आयोजित भूमिका बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्यावतीने व स्वराज आंदोलन वृत्तपत्रच्या वतीने संपन्न लोक सेवक पुरस्कार देण्यात आला आहे. या संमेलनामध्ये सामाजिक कार्यकर्ते गणेश वराडे यांना लोक सेवक पुरस्कार प्रधान करण्यात आला असून या संमेलनाचे अध्यक्ष एडवोकेट मनोज पिंगळे असून रवींद्र नेरकर वैभव आत्रम, दादासाहेब ईलकल संजय यादव, ज्योती ठाकूर, भूमिका बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा स्वराज आंदोलन न्यूज आणि वृत्तपत्राचे संपादक सुखदेव भालेराव आदी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला आहे. राज्यस्तरीय लोकसेवक पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून वराडे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## अवकाळी पावसाने शिक्षक सूर्यकांत नाथाराव मुळे यांनी

# शेतातील खोलीकरण केलेला उत्कृष्ठ नाला खोलीकरण प्रकल्प पाण्याने भरला तुडूंब

ताड हादगांव ।प्रतिनिधी

भालगाव येथील शिक्षक सूर्यकांत नाथाराव मुळे यांनी समस्त महाजन ट्रस्ट मुंबई यांच्या वतीने व समस्त महाजन ट्रस्टच्या नूतनजी देसाई मॅडम,अंबड तालुक्याचे शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष उपविभागीय अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण साहेब, तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब गंडे,सामाजिक कार्यकर्ते देवानंदजी चित्राल सर, भारतीय लोकशाही न्यूजचे प्रतिनिधी आकाशजी जळके सर, अनिल डवले आदींच्या प्रेरणेने आपल्या भालगाव येथील शेतातील नाला, खोलीकरणाच्या संदर्भात चर्चा करून कल्याण मुळे, आदी नदीच्या दोन्ही बाजूच्या शेतकऱ्याला विश्वासात घेऊन समस्त महाजन ट्रस्ट मुंबई यांची मशीन आणून ३६ फूट खोल आणि ४०० ते ५०० फूट लांब खोलीकरण करून एक आदर्श बघण्यासारखा प्रकल्प केला आहे.

हे काम पाहिल्यावरच लक्षात येते की शिक्षक सूर्यकांत नाथाराव मुळे यांची संकल्पना किती मोठी आहे, नोकरी सांभाळत असताना शेतीविषयी त्यांच्या मनात किती प्रेम, आपुलकी आहे हे लक्षात येते, त्यांच्या या



नाला खोलीकरणा मुळे आजूबाजूच्या सर्व विहिरी यांना बाराही महिने पाणी राहणार असून पाण्याचे महत्व समजणार आहे, त्यांचे व नदीच्या दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत असून इतर सर्व शेतकऱ्यांनी नाला खोलीकरण केल्यास त्याचा फायदा विहिरीला होऊन पूर्ण शेती बागायती झाल्याशिवाय राहणार नाही असे शिक्षक सूर्यकांत नाथाराव मुळे यांनी सांगितले असून सर्व नदीच्या दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांने नाला खोलीकरण करावे असे त्यांनी गावकऱ्यांना आवाहन केले आहे..


# पाऊस येतो तासभर लाईट जाते रातभर

## अवकाळी पावसाने विजेचा लपंडाव सुरू

**जाफराबाद ।प्रतिनिधी**

**अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात रात्री विजेचा लपंडाव सुरू आहे, पाऊस पडतो तासभर आणि लाईट जाते रात्रभर अशी अवस्था शहरासह तालुक्यात झाली आहे. याचा अर्थ वीज अनियमितपणे येते जाते ज्यामुळे रात्रीच्या वेळीच वीज गायब झाल्यामुळे नागरिकांना त्रास होत असून पाऊस आणि वादळ वाऱ्यामुळे वारंवार वीजखंडीत होणे तसेच वीज वितरण यंत्रणेतील बिघाडामुळे वीजपुरवठा अनियमित होतो.तर काही ठिकाणी भारनियमनामुळे वीजपुरवठा कमी होतो.**

या वारंवार विजेचा लपंडाव सुरू असल्याने आणि रात्रीच्या वेळीच वीज गायब झाल्यामुळे वातानुकूलित



यंत्रे, पंखे व कूलर बंद पडल्याने नागरिक उकाड्याने हैराण झाले आहेत. विजेच्या लपंडावामुळे नागरिकांना अनेक अडचणी येत असून वीज कधी येईल, याचा निश्चित अंदाज नसतो.

उत्पादनात अडथळे: अनेक उद्योग आणि व्यवसायांवर विजेचा लपंडाव परिणाम करतो. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून वीज वितरण प्रणाली अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.या उपायांमुळे विजेचा लपंडाव कमी होण्यास मदत होईल आणि नागरिकांना वीजपुरवठा सुरळीत मिळेल.

शहरासह ग्रामीण भागातील अवकाळी पावसाने

मध्यरात्रीपासुन विजेचा लंपडाव सुरू झाला आहे. उकाडा असल्याने ग्रामस्थ हैराण होत आहे. गेल्या पाच ते सहा दिवसापासुन दुपारी रात्री पाऊस पडत दिवसभर प्रचंड उकाडा जाणवत आहे. ग्रामीण भागा मध्ये बर्याच भागात विजेचा लपंडाव सुरू आहे. याकडे महावितरणचे अधिकारी यांनी तात्काळ लक्ष घालून वीजेच्या लपंडाव बंद करून वीजपुरवठा सुरळीत करण्यात यावा अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ परीक्षेचे प्रवेशपत्र संकेतस्थळावर उपलब्ध

लातूर ।प्रतिनिधी

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थानाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने २७ मे ते दिनांक ३० मे २०२५ व २ जून ते दिनांक ५ जून २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आलेले आहे.

यासाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्राची वेबलिंक महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या ु.ीलशर्ीपिश.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्याचे पुणे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# बोगस कृषी निविष्ठा बाबत करा तक्रार - साहिल सय्यद

कडा ।प्रतिनिधी

जिल्ह्यातील बियाणे, खते व कीटकनाशके यांच्या खरेदी विक्री, गुणवत्ता व पुरवठयाच्या अनुषंगाने येणाऱ्या अडचणींचे तत्काळ निवारण करण्यासाठी खरीप हंगामासाठी १५ मे ते १५ ऑगस्ट या कालावधीत जिल्हास्तरावर 'निविष्ठा उपलब्धता व तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे, असे कृषी विभागाने कळविले आहे.



सदर नियंत्रण कक्षाशी दररोज सकाळी १० ते सायंकाळी ७ या वेळेत भ्रमणध्वनी क्रमांक ९४०३ ३०८ ६०८ तसेच टोल फ्री क्रमांक १८००२३३४००० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विकास अधिकारी श्री साहिल सय्यद यांनी जिल्यातील सर्व नागरिकांना केले आहे.जिल्हास्तरावर १ व तालुकास्तरावर प्रत्येकी १ असे जिल्ह्यात एकूण १२ भरारी पथके स्थापन केली आहेत. त्याचबरोबर दि. १ जून २०२५ पासून कृषी निविष्ठा संबंधित तक्रार निवारण कक्षबाबत माहीती देणारे फलक प्रत्येक निविष्ठा केंद्रामध्ये दर्शनिय भागावर लावण्याबाबत बंधनकारक करण्यात आलेले आहे. जिल्ह्यातील कृषी विभागाचे पथक बारीक लक्ष ठेऊन आहे असे साहिल सय्यद कृषी विकास अधिकारी, जि. प. बीड यांनी आवाहन केले आहे.

जास्त दराने खताची विक्री झाल्यास कारवाई..

पुढील काही दिवसात पेरणीच्या कामांना वेग येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बियाणे खरेदीस सुरूवात केली आहे.बियाणे व खते यात बोगस कंपन्यांच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचे शेतकऱ्याचे नुकसान होऊ नये याची काळजी कृषी विभागामार्फत घेतली जात आहे. युरिया खत ज्यादा दराने विक्री केल्याचे व युरिया सोबत इतर अनावश्यक खते लिंकिंग करीत असल्याचे निदर्शनास आल्यास कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा मोहीम अधिकारी सायप्पा गरांडे यांनी दिला आहे.

तालुक्याशी संपर्क साधावा...


खते, बियाणे विक्रीदरम्यान काही गैरव्यवहार होत असल्यास शेतकऱ्यांनी स्थानिक कृषी सहायक किंवा तालुक्यातील कृषी अधिकारी, पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# माजी मुख्यमंत्री विलासरावजी देशमुख यांच्या ८० व्या जयंतीनिमीत्त विलासबाग, बाभळगाव येथे आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन

लातूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, माजी केंद्रीय मंत्री विलासराव देशमुख यांच्या ८० जयंतीनिमित्त सोमवार दि. २६, मे २०२५ रोजी सकाळी ९.०० वाजता बाभळगाव येथील विलासबाग येथे सार्वजनिक आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रात मंत्री म्हणून विलासरावजी देशमुख साहेब यांना लोककल्याणाची विचारवाहिनी म्हणून आपण सर्वजण ओळखतो. त्यांनी आपल्या कर्तृत्व, वक्तृत्व आणि नेतृत्वगुणांच्या जोरावर भारतीय राजकारणात एक विशेष स्थान निर्माण केले. सार्वजनीक जीवनात बाभळगावचे सरपंच ते राज्याचे मुख्यमंत्री आणि केंद्रीय मंत्री असा यशस्वी राजकीय प्रवास केला. सामान्य जनतेच्या प्रती आपुलकी आणि लोककल्याणकारी कामात धडाडी यामुळे त्यांना मोठी लोकप्रीयता लाभली. संघटन कौशल्य लोकांचे पाठबळ यांमुळे ते नेहमी निर्णायक भुमीकेत राहीले.मिळालेल्या संधीच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, कृषी, सहकार, आर्थिक आदी क्षेत्रात भरीव कार्य केले. जलसंधारण, बॅरेज बांधणी आदी अभिनव प्रयोग करुन करुन राज्यातील सिंचन क्षेत्र वाढवले. साखर कारखानदारी तसेच तेल, दाळ आदी कृषीपुरक उदयोगाला चालना देऊन ग्रामीण भागात आर्थिक क्रांती घडवली. शहरातील दळवळण आणि उदयोग उभारणीला गती देऊन विकास प्रक्रीयेत समातोल साधला. त्यामुळे लोकमानसात त्याच्या कार्यकतृत्वाचा प्रभाव कायम



आहे.अशा कतृत्व संपन् नेतृत्वाच्या ८० व्या जयंतीनिमित्त सोमवार दि. २६, मे २०२५ रोजी बाभळगाव येथील विलासबाग येथे आयोजित या कार्यक्रमातून त्यांच्या कार्याला स्मरणपूर्वक आदरांजली वाहण्यात येणार आहे. या सभेसाठी सकाळी सर्वांनी ८.४५ वाजता विलासबाग येथे स्थानापन्न व्हावे अशी अपेक्षा आहे. सकाळी ९.०० वाजता सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक भारतरत्न भीमसेन जोशी यांचे शिष्य किराणा घराण्यातील गायक आणि बालगंधर्व या चित्रपटाचे पार्श्वगायक आनंद भाटे व त्यांच्या सहकाऱ्यांकडून, तीर्थ विठ्ठल, माझे माहेर पंढरी, इंद्रायणी काठी, चिन्मया सकल हृदया या गीतांसह शास्त्रीय संगीताच्या माध्यमातून भावस्वरांजली हा कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे, उपस्थित सर्वांनी पुष्पांजली अर्पण केल्यानंतर १०.०० वाजता आदरांजली सभेचा समारोप होईल.या सभेचे सुत्रसंचालन बाळकृष्ण धायगुडे व सचिन सुर्यवंशी करणार आहेत. या आदरांजली कार्यक्रमास विलासबाग, बाभळगाव येथे जनतेने आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन देशमुख कुटूंबियांच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122 (MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी म्हणजेच साप्ताहिक
शिव वाणी SHIV VANI



# ऑल इज वेल...

गेल्या वर्षी नोव्हेंबर २०२४ मध्ये महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपा, शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या महायुतीला जनतेने महाप्रचंड बहुमताने निवडून दिले. विधानसभेतील २८८ पैकी २३५ जागांवर महायुतीचे आमदार निवडून आले. भाजपाचे विक्रमी संख्येने १३४ आमदार निवडून आले. सर्वाधिक आमदार असलेल्या पक्षाचे नेते म्हणून देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री, एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे दोन उपमुख्यमंत्री असे महाराष्ट्रात ट्रिपल इंजिन सरकार स्थापन झाले. ज्यांना राजकारणात करिअर करायचे आहे, ज्यांना सार्वजनिक जीवनात उमेदीने काम करायचे आहे, ज्यांना जनसेवेसाठी झोकून द्यायचे आहे, ज्यांचा मोदी-शहांच्या भूमिकेवर आणि भाजपाच्या ध्येय-धोरणांवर विश्वास आहे, त्या सर्वांना महायुतीचा दरवाजा खुला आहे, असा संदेश भाजपाने दिलेला आहे. राज्यात डिसेंबर २०२४ मध्ये महायुतीची ०२ कारकीर्द सुरू झाली पण त्यात कुठेही छगन भुजबळ नव्हते. भुजबळांसाठी हा मोठा धक्का होता. महायुतीच्या सरकारमध्ये आपल्याला डावलण्यात आल्याची भावना त्यांनी अनेकदा बोलून दाखवली. पक्षाच्या अंतर्गत राजकारणामुळे भुजबळांना मंत्रीपदापासून दूर राहावे लागले, अशी उघड चर्चा त्यांच्या समर्थकांत होती. अविभाजित शिवसेनेत बंडाचा झेंडा फडकावून शरद पवारांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेसमध्ये गेलेल्या भुजबळांना १९९१ पासून राज्यात सतत कॅबिनेट मंत्री म्हणून स्थान होते. पण महायुती सरकारच्या ०२ मध्ये त्यांना मंत्रालयातील सत्तेच्या कॅरिडॉरपासून वंचित ठेवले गेले. ओबीसी समाजाचा आक्रमक नेता महाराष्ट्रात दुसरा कोणी नाही, असे चित्र भुजबळांच्या समर्थकांनी सातत्याने निर्माण केले. भुजबळांना सरकारमधून वगळणे म्हणजे ओबीसी समाजावर अन्याय आहे असे ते ठसवत राहिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सामोरे जायचे असेल तर महायुतीकडे भुजबळांसारखा नेता असणे गरजेचे आहे, असे महायुतीला विशेषत: भाजपालाही वाटू लागले. मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांच्या मागणीला उघडपणे विरोध करण्याची हिम्मत भुजबळांनी दाखवली. मराठा आरक्षणाला आपला विरोध नाही पण ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागता कामा नये अशी त्यांनी ताठर भूमिका कायम ठेवली. बीडमधील मस्साजोगच्या सरपंचाच्या क्रूर हत्येनंतर चोहोबाजूने जनाक्रोश प्रकट झाल्याने धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाचा राजीनामा देणे भाग पडले आणि त्या दिवसापासून त्यांच्याजागी भुजबळ पुन्हा मंत्री होणार अशा चर्चेला उधाण आले.

अवघ्या सहा महिन्यांत भुजबळांचे सरकारमध्ये पुनरागमन झाले, याचे अनेकांना आश्चर्य वाटले आणि भाजपाच्या चतुर खेळीनेही अनेक जण हबकले. भुजबळांच्या पुनरागमनानंतर नाशिक जिल्ह्यातील अनेक नेत्यांना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील काहींना आपल्या राजकीय भविष्याची काळजी वाटू लागली. भुजबळांना मंत्री करून भाजपाने एक नेम धरून अनेक तीर मारलेत अशीही कुजबूज ऐकायला मिळाली.

सत्त्याहत्तर वर्षांचे छगन भुजबळ यांची महायुतीला मंत्री म्हणून खरंच गरज वाटते आहे का? ज्या भुजबळांवर भाजपाने शंभर कोटींचा घोटाळा झाल्याचे गंभीर आरोप भाजपाने केले होते, जे भुजबळ ईडी व अँटी करप्शनच्या चौकशीच्या जाळ्यात सापडले होते, जे भुजबळ दोन वर्षे जेलमध्ये होते, ते पुन्हा महायुतीच्या सरकारमध्ये येऊन कॅबिनेटमंत्री म्हणून शपथ घेतात हे अनाकलनीय आहे. भुजबळ कोणामुळे जेलमध्ये गेले व कोणामुळे सरकारमध्ये मंत्री म्हणून परत आले? सरकारमध्ये स्वत: देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजितदादा पवार असे ताकदवान नेते आहेत. महायुतीत नेत्यांची फळी व कार्यकर्त्यांची फौज आहे. चंद्रशेखर बावनकुळे, सुनील तटकरेंसारखे संघटक आहेत. एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत रोज कोणीना कोणी नेता अनुयायांसह प्रवेश करीत आहे. तरीही महायुतीला भुजबळांसारखा चेहरा सरकारमध्ये मंत्री म्हणून पाहिजे आहे. यावर्षी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व पंचायत राज समितीच्या निवडणुकांमध्ये मतदारांना आकर्षित करण्यासाठी ताकदवान ओबीसी नेता महायुतीला हवा आहे, हे एकमेव कारण त्यामागे आहे काय? पक्षश्रेष्ठींच्या संमतीशिवाय भुजबळांचा महायुती सरकारमध्ये कोणाचीही मंत्री म्हणून शपथविधी होऊ शकत नाही. त्यामुळे भाजपा श्रेष्ठींनी दिल्लीहून हिरवा कंदील दाखविल्यानंतरच मुंबईतील राजभवनावर राज्यपाल राधाकृष्णन यांनी भुजबळांना कॅबिनेटमंत्री म्हणून शपथ दिली. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या साक्षीने हा शपथविधी सोहळा पार पडला. म्हणूनच भुजबळांना मंत्रीपद देण्यास आम्ही राजी नव्हतो असे कुणालाही उद्या म्हणता येणार नाही. भुजबळांनी भ्रष्टाचाराच्या आरोपावरून दोन वर्षे जेलमध्ये काढली असली तरी त्यांचे निवडणुकीच्या राजकारणातले महत्त्व कायम आहे, हेच त्यांच्या पुनरागमनाने दाखवून दिले आहे.

मुंबईतील भायखळ्याच्या मंडईत भुजबळांचा भाजीपाल्याचा व्यवसाय होता. १९७० मध्ये एक शिवसैनिक म्हणून त्यांनी कामाला सुरुवात केली. त्यावेळी त्यांची शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंवर निष्ठा होती. शिवसेनाप्रमुखांच्या आशीर्वादानेच मुंबई महापालिकेवर नगरसेवक, दोन वेळा महापौर, आमदार झाले. १९९१ मध्ये त्यांनी शिवसेनेत बंड केले व डझनभर आमदारांसह काँग्रेसमध्ये गेले. शरद पवारांचा विश्वास संपादन करून त्यांनी राज्यात मंत्रीपद, उपमुख्यमंत्रीपद मिळवले. १९९९ मध्ये ते काँग्रेस सोडून शरद पवारांबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. जुलै २०२३ मध्ये शरद पवारांचे नेतृत्व सोडून ते अजित पवारांच्या बरोबर गेले. आता त्यांचा ओढा भाजपाकडे दिसतो अशी चर्चा उघड होते आहे. शिवसेनेत बंड करून ते काँग्रेसमध्ये गेले तेव्हा शिवसेनाप्रमुखांनी त्यांची लखोबा अशी संभावना केली होती, नंतर सत्तेत असताना भुजबळांनी शिवसेनाप्रमुखांना एका जुन्या प्रकरणात अटक करून दाखवली होती पण ती अटक न्यायालयात क्षणभरही टिकली नाही.

भुजबळांचा मंत्रीपदाचा शपथविधी झाल्यानंतर नाशिक जिल्ह्यात त्यांच्या अभिनंदनाचे फलक लागले. पण माध्यमात व समाज माध्यमांवर भुजबळांवर कोणी, केव्हा, काय भ्रष्टाचाराचे आरोप केले, याच्याही क्लिप्स व्हायरल झाल्या. भाजपाने दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदन उभारणीत व अन्य काही प्रकरणात भुजबळांवर शंभर कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचे आरोप केले होते. जे आज महायुतीच्या सरकारमध्ये आहेत, त्याच नेत्यांनी भुजबळांवर ते मंत्री असताना सत्तेचा गैरवापर केला, असा आरोप केला होता. भुजबळांना तुरुंगवास झाला तो काही स्वातंत्र्यसैनिक म्हणून नव्हे किंवा जनआंदोलन केले म्हणून नव्हे, तर घोटाळा केला म्हणून तपास यंत्रणांनी त्यांना जेलमध्ये पाठवले होते अशा आरोपांचे त्या वेळचे व्हीडिओ आज सोशल मीडियावर फिरत आहेत. भाजपाच्या बड्या नेत्यांनी भुजबळांसारखे हातवारे करीत त्यांच्या नकलाही जाहीर सभांतून केल्या. एवढेच नव्हे असा नटसम्राट महाराष्ट्रात झाला नाही अशीही त्यांची खिल्ली उडवली होती. दहा वर्षांपूर्वी ज्यांनी विरोध केला तेच आता भुजबळांचा महायुतीला (निवडणुकीत मतांसाठी) कसा उपयोग होईल असे सांगत आहेत. भुजबळांना पुन्हा मंत्री करायला जनतेने विरोध दर्शवला नाही व नव्हता. भुजबळांनी मंत्रीपदाची शपथ घेतली म्हणून महाराष्ट्रात कुणीही रस्त्यावर येऊन निषेध नोंदवला नाही. भुजबळांवर ज्यांनी भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केले त्यांनीच त्यांना सरकारमध्ये मंत्री म्हणून घेतले, याचे जनतेला आश्चर्य वाटले. भुजबळांना मंत्रीपद मिळाले, याचा अर्थ त्यांच्यावरील शंभर कोटींच्या घोटाळ्याचा आरोप खोटा होता का? ईडी किंवा अँटी करप्शनने त्यांना क्लीनचिट दिली का? ते जामिनावर आहेत, न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केलेले नाही, असे सांगितले जाते, ते खरे आहे का? सत्तेवर नसताना भुजबळ यांनी आपणच ओबीसी समाजाचे तारणहार, रक्षणकर्ते व पालनकर्ते आहोत अशी स्वत:ची प्रतिमा निर्माण केली होती. ते केवळ पुन्हा मंत्रीपद मिळविण्यासाठी होते का? भाजपाने गेल्या निवडणूक प्रचारात भुजबळांवर आरोप करून जनतेची सहानुभूती मिळवली. भुजबळ हे खलनायक आहेत, असे चित्र भाजपाने रंगवले होते. आता जनतेने सर्व विसरायचे का? आता भुजबळ एकदम गुणसंपन्न वाटू लागले आहेत. एकदा मान-सन्मान, अधिकार व पद दिले की बाकी सर्व दुय्यम ठरते, हेच यानिमित्ताने महाराष्ट्राला अनुभवायला मिळाले. महाराष्ट्रातील जनतेचा पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आजही मोठा विश्वास आहे. त्यांच्याकडे पाहूनच महाराष्ट्रातील जनता उद्याच्या भविष्याची स्वप्ने पाहत आहे. भुजबळांना सहा महिन्यांपूर्वी डावलण्यात आले तेव्हा ते म्हणाले होते, जहां नही चैना, वहा नही रहना... आणि मंत्रीपदाची शपथ घेतल्यावर ते म्हणाले – ऑल इज वेल, दॅटस एन्ड वेल...

प्रशांत बाफना/अहिल्या नगर जिल्हा प्रतिनिधी ८०५५४४०३८५

# १ मे कामगार दिनानिमित्त ध्वजारोहणास गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करा..

## अप्पर आयुक्त महसूल यांचे अप्पर आयुक्त नाशिक यांना आदेश !

अहिल्यानगर/प्रशांत बाफना

एक मे कामगार दिनानिमित्त पाथर्डी पंचायत समितीतील ध्वजारोहणास गैरहजर राहणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांची चौकशी करा असे आदेश अप्पर आयुक्त महसूल यांचे अप्पर आयुक्त नाशिक (विकास अस्था) यांना देण्यात आले आहे. यासंदर्भात माहिती अधिकार महासंघाने मुख्यमंत्री सचिवालया कडे ध्वजारोहणास गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भात तक्रार केली होती.

अहिल्यानगर माहिती अधिकार महासंघाचे जिल्हा अध्यक्ष शैलेंद्र जायभाये यांनी मुख्यमंत्री सचिवालय कडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, एक मे रोजी कामगार दिनानिमित्त पाथर्डी पंचायत समितीमध्ये ध्वजारोहण केले जाते या ध्वजारोहणास पाथर्डी पंचायत समितीतील अधिकारी व कर्मचारी या झेंडावंदनाच्या कार्यक्रमास झेंड्याला मानवंदना देण्यासाठी गैरहजर राहिले, त्यांच्यावर तत्काळ कारवाई करून त्यांची सेवा समाप्त करण्यात यावी अशी मागणी त्यांनी मुख्यमंत्री सचिवलयाकडे केली होती, त्या तक्रारीच्या अनुषंगाने अप्पर आयुक्त महसूल यांनी याबाबत चौकशीचे आदेश दिले आहेत.



पाथर्डी पंचायत समितीतील ध्वजारोहणास जे सहा कर्मचारी गैरहजर होते त्यांना याबाबत खुलासा मागवला होता. त्यातील फक्त एका कर्मचाऱ्याचा खुलासा प्राप्त झाला आहे.

शिवाजी कांबळे,
गटविकास अधिकारी, पाथर्डी पंचायत समिती

# गडब गावातील नाल्यातून उग्र वास ; ग्रामस्थांच्या जिवितास धोका ; ग्रामसेवक सरपंच अनभिज्ञ

गडब / सुरेश म्हात्रे

पेण तालुक्यातील सर्वात श्रीमंत असणाऱ्या ग्रामपंचायती मधील मुख्य नाल्यात काही समाजकंटक बेफान घाण आणि कचरा टाकत असल्याने या गंभीर बाबीकडे ग्रामपंचायतीला वारंवार कळवूनही त्याकडे जानुबूजून दुर्लक्ष होत असल्याने नाल्या शेजारी राहणाऱ्या नागरिकांना विविध आजार उदभवत आहेत या कचऱ्याच्या ढीगामुळे पुर्ण नाळा तुडूंब भरला असून संबंधीत ग्रामसेवक आणि सरपंच दुर्लक्ष करित असल्याचे जाणवते . यापुर्वी संरक्षणभीत उंच बांधली नसताना गावातील ग्रामस्थ आपल्या साईनुसार जवळ कचरा टाकत होते पण आता संरक्षण भिंत बांधल्या नंतर सदरचा कचरा नाल्याच्या शेजारी राहणाऱ्या लोकांच्या खिडकी समोर एकाच ठिकाणी टाकला जातो त्यामुळे कचऱ्याच ढीगारे साचले आहेत .



संबंधीत ग्रुप ग्रामपंचायतीला वेळोवेळी पत्रव्यवहार करूनही त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष होत असल्याचे जाणवते या संदर्भात संबंधीत ग्रामसेवकांना विचारणा केली असता सदर कचऱ्या बाबत दोनदिवसात कारवाई करणार असल्याचे थातूरमातूर उत्तर दिली जातात .

सदर कचऱ्या संदर्भात पत्रकार सुरेश म्हात्रे यांनी ग्रामसभेत विषय मांडला असता सदर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली जाईल असा ठराव ग्रामसेवक सरपंच आणि सदस्य व ग्रामस्थ यांच्या समवेत घेण्यात येऊन त्यास संमती देऊन सुद्धा कोणत्याही प्रकारे आजतोपर एकावरही कारवाई केली गेली नाही .

सदर कचऱ्या संदर्भात गेली सहा महिन्या पुर्वी पत्रकार अवंतिका म्हात्रे यांनी नाल्या शेजारी बांधण्यात आलेल्या संरक्षण भींती संदर्भात अर्ज केला होता की सदर संरक्षण भींत ही वर्क ऑर्डर प्रमाणे बांधली आहे का ? आपल्या पदरात बील पाडण्याच्य हेतूने ही संरक्षण भिंत बांधण्यात आली असून सदर कामाचे बील वर्कऑर्डर तपासून देण्यात यावे असे लेखी दिले असताना बिल दिले असल्याचे समजते .यासंदर्भात पत्रकार म्हात्रे हे पंचायत समिती पेण व जिल्हा परिषद अलिबाग येथे अर्ज करणार असल्याचे समजते .

सदर ग्रामपंचायत येथे करण्यात येणाऱ्या अर्जाना उत्तर न देता प्रत्यक्षात केराची टोपली दाखविली जाते अशा ह्या मुजोर ग्रामपंचायत ग्रामसेवक व सरपंच यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सदर अर्जदार पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांच्याकडे दाद मागणार असल्याचे समजते .

# रिसॉर्टमधील विवाह डेस्टिनेशन वेडिंग एक नवा सामाजिक आजार

पूर्वीच्या काळी समाज भवन मंगल कार्यालय पंचायती भवनांचा वापर लग्न समारंभासाठी होत असे ही सर्व ठिकाणं आता निकामी झाली आहेत.काही वर्षांपूर्वी पर्यंत शहरातल्या समाजाच्या मंगल कार्यालय/पंचायत भवन येथे लग्न होणं सामान्य होतं, पण तो काळही आता संपत आला आहे. आता शहरापासून दूर महागड्या रिसॉर्टमध्ये लग्न समारंभ होऊ लागले आहेत. लग्नाच्या दोन दिवस आधी पासूनच हे रिसॉर्ट बुक केली जातात आणि संपूर्ण कुटुंब तिथे स्थलांतर होते पाहुणे थेट तिथेच पोहोचतात आणि तिथूनच निरोप घेतात. इतक्या लांबच्या समारंभाला स्वतःचे चार चाकी वाहन असलेलेच पोहोचू शकतात.

आणि खरी गोष्ट म्हणजे आमंत्रण देणाऱ्यालाही हेच हवं असतं की, केवळ कारधारक आणि स्टेटसवाले पाहुणेच येवोत. आता २-३ प्रकारची आमंत्रणं दिली जातात:फक्त महिलांसाठी संगीत कार्यक्रमासाठी फक्त रिसेप्शनसाठी फक्त कॉकटेल पार्टीसाठी

आणि काही त.ख.झ. लोकांना सर्व कार्यक्रमांसाठी.या प्रकारच्या निमंत्रणात आपलेपणाची भावना राहिलीच नाही, केवळ उपयोगी लोकांनाच बोलावलं जातं. महिला संगीतासाठी संपूर्ण कुटुंबाला डान्स शिकवण्यासाठी महागडे कोरिओग्राफर १०-१५ दिवस ट्रेनिंग देतात. मेहंदी लावण्यासाठी कलाकार बोलवले जातात, हळदीसाठी सुद्धा एक्सपर्ट नेमले जातात.मेहंदीच्या कार्यक्रमात सगळ्यांना हिरव्या रंगाचे कपडे घालणे अनिवार्य केले जाते. जो न घालेल त्याला कमी समजले जाते. म्हणजेच कमी दर्जाचा मानला जातो. ब्युटी पार्लर २-३ दिवसांसाठी बुक केले जातात. यानंतर हळदीचा कार्यक्रम होतो. इथे सगळ्यांनी पिवळा कुर्ता-पायजमा घालणे गरजेचे असते. जो हे न पाळेल त्याला देखील कमी समजलं जातं. प्रत्येक कुटुंब वेगवेगळ्या खोलीत राहतं, त्यामुळे भेटणारे नातलग एकमेकांना भेटत नाहीत. सगळे श्रीमंत झाले आहेत, पैसेवाल्या जगात आपुलकी हरवून गेली आहे. आता समारंभातही मोबाइलवरून बोलविल्यावरच लोक बाहेर येतात. प्रत्येकाला वाटतं की मी दुसऱ्यापेक्षा श्रीमंत आहे.लग्नाच्या स्वागतद्वारावर नवदांपत्याच्या प्री-वेडिंग फोटोशूटमधील आलिंगनाचे फोटो लावलेले असतात, जे आपल्या संस्कृतीला झटका देणारे असतात. आता नववधूच्या नावापुढे 'सौ.' किंवा वराच्या नावासमोर 'चि.' असा उल्लेख होत नाही. सर्व इंग्रजीमध्ये असतं.

एंट्री गेटजवळ मोठ्या स्क्रीनवर त्यांच्या फिल्मी शैलीतील प्री-वेडिंग व्हिडिओ दाखवले जातात. कार्यक्रम आशीर्वादासारखा वाटतच नाही. स्टेजवर नवदांपत्य आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर थिरकत असतं, आपल्याच संस्कारांचे प्रदर्शन करत.स्टेजजवळ स्क्रीनवर प्री-वेडिंग शूट दाखवलं जातं, ज्यात त्यांची आधीच भेट झालेली असते आणि मुलगी अंगप्रदर्शन करणारे कपडे घालून चट्टानांवर, बागांमध्ये, कुंभारवाड्यांमध्ये, स्मशानात किंवा कृत्रिम फुलांमध्ये पोझ करताना दिसते. या नंतर रिसेप्शन सुरू होतं, स्टेजवर वरमाला होते. पूर्वी वर-वधूचे कुटुंबीय मिळून हसतखेळत वरमाला घालायचे. आता स्टेजवर धूर सोडला जातो, सगळ्यांना दूर हटवलं जातं आणि दांपत्य स्लो-मोशनमध्ये फिल्मी स्टाईलमध्ये वरमाला घालतात. त्यात लेझर शो आणि फटाकेही असतात. यानंतर वरात निघते. बऱ्याच घरांतील सुसंस्कृत मुली ५० हजार रुपये खर्च करून ढोल-ताशावर नाचतात.आपली संस्कृती बिघडवण्याचे काम हे अतिसंपन्न वर्ग करत आहेत.माझं सर्व मध्यमवर्गीय समाज बांधवांना आवाहन आहे की, आपले पैसे आहेत, आनंद साजरा करा, पण इतरांची नक्कल करू नका. कर्ज काढून आपला आणि आपल्या कुटुंबाचा सन्मान गमावू नका. आपल्या क्षमतेनुसार खर्च करा. चार-पाच तासांच्या रिसेप्शनसाठी आयुष्यभराची कमाई खर्च होते आणि जेवढंच करू, लोक फक्त रिसेप्शन हॉलपर्यंतच तुमचं कौतुक करतील आणि भेट पाकीट देऊन निघून जातील. माझे तरुण पिढीकडेही आवाहन आहे की, आपल्या कुटुंबाला त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक खर्च करण्यास भाग पाडू नका. तुमचं लग्न हे तुमच्या आई वडिलांच्या त्यागाचे फलित आहे, आणि त्याचं मोल तुम्हाला फक्त स्वतः आई-वडील झाल्यावर कळेल. हा दिखाव्याचा आजार फक्त उच्चवर्गापुरताच मर्यादित ठेवा. आपलं वैवाहिक आयुष्य अभिमानाने, आत्मसन्मानाने सुरू करा आणि स्वतःला आपल्या कुटुंबासाठी व समाजासाठी योग्य सिद्ध करा. ५० लाख ते १ कोटी रुपयांच्या लग्नात वर-वधूच्या अंगावर किती दागिने असतात, पण उगाचच त्या पैशांचं दहापट खर्च केलं जातं, केवळ दिखाव्यासाठी.

कृपया समाजातील प्रत्येक व्यक्ती यावर गंभीर चिंतन करावं आणि भविष्यात या आजारातून मुक्त होण्यासाठी योग्य पावलं उचलावीत.आज काल च्या लग्न समारंभात व्याही भेट नसते वरमाईला मान नसतो भटजींच्या टायमिंगला महत्व नसते एक इव्हेंट सारखं सगळं यंत्रवत असत व्हिडिओ शुटिंगवाले फोटो ग्राफर कार्यलयाच्या दारापासून निघणारी वधूवरांची आतिषबाजी युक्त वरात यांनी नवरदेव नवरी हॅक करून टाकलेले असतात लग्न फाईव्ह स्टार करायच्या नादात आपलेपणा आपुलकी जेवणाचा आग्रह सगळंच हरवून गेलं काय ?प्रशांत बाफना /अहिल्या नगर जिल्हा प्रतिनिधी ८०५५४४०३८५

# सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत थायरॉईड निदान अभियान

## वर्षभर चालणाऱ्या अभियानात १० हजार चाचण्यांचे उद्दिष्ट-डॉ. राजेश सेठीया

डॉ आशिष तिवारी/जालना

सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत थायराइड निदान अभियान राबविण्यात येणार असून, प्रकल्प प्रमुख रुबी हॉस्पिटलचे संचालक डॉ. राजेश सेठीया यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभरात १० हजार थायरॉईड चाचण्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बगडिया यांनी दिली.

२५ मे हा जागतिक थायरॉईड दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून या अभियानाची रूपरेषा विषद करताना श्री. बगडिया म्हणाले की, १ जुलै २०२५ डॉक्टर डे पासून ३० जून २०२६ असे वर्षभर थायरॉईड निदान अभियान राबविले जाणार असून, या अभियानासाठी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या नूतन अध्यक्ष डॉ. प्रतिभा श्रीपत, सचिव पंकज लड्डा, इंद्रायणी पॅथॉलॉजीचे डॉ. जितेंद्र बारगाजे, डॉ. संदीप कुलकर्णी यांचे सहकार्य लाभणार आहे. या आजाराचे वेळीच निदान होणे गरजेचे आहे; अन्यथा अनेक संभाव्य धोके असतात. शासन आणि विविध सेवाभावी संस्था अनेक आजाराबाबत निदान मोहीम, अभियान राबवितात. मात्र, थायरॉईड निदान दुर्लक्षित आहे. सर्वसामान्य जनता अद्यापही थायरॉईडबाबत अनभिज्ञ आहे. विशेष करून या चाचण्या महागड्या असल्याने, सर्वसामान्य जनता स्वतःहून निदान करण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. वेळेवर निदान होऊन उपचाराने पुढील संभाव्य गुंतागुंतीचे आजार टाळण्याच्या उद्देशाने आम्ही विशेष अभियान राबवणार आहोत. यापूर्वी रोटरी इंटरनॅशनलचे डायबिटीज डायरेक्टर डॉ. राजेश सेठिया यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण प्रांतात राबविण्यात आलेल्या अब की बार एक लाख पार या मोफत मधुमेह निदान अभियानाची यशस्विता पाहता, प्रकल्प प्रमुख डॉ. सेठीया यांच्या संकल्पनेतून वर्षभर मोफत थायरॉईड निदान अभियान राबविण्याचा निर्णय ट्रस्टने घेतल्याची माहिती पन्नालाल बगडिया यांनी दिली. या अभियानासाठी ग्रामीण आणि शहरी भागात जिल्हाभर जनजागृती केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.



पन्नालाल बगडिया



डॉ. राजेश सेठीया

या अभियानाचे प्रकल्प प्रमुख डॉ. सेठीया म्हणाले की, सामाजिक दायित्वातून सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष पन्नालाल बागडिया यांचे शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक उपक्रमासाठी नेहमीच योगदान लाभत आलेले आहे. रोटरीच्या प्रांत स्तरावरील अब की बार एक लाख पार या मोफत मधुमेह निदान अभियानात ३० हजार मधुमेह तपासणी किट्सचे योगदान सौ. जमुनाबाई शिवरतनजी बगडिया ट्रस्टचे राहिलेले आहे. आता ट्रस्टमार्फत राबविले जाणारे मोफत थायरॉईड निदान अभियान अत्यंत स्तुत्य ठरणार असून, असे सांगून ते म्हणाले की, थायरॉईड ग्रंथीच्या कार्यातील बिघाडामुळे वजन वाढणे किंवा घटणे, थकवा, केस गळणे, मासिक पाळीतील बदल, त्वचा कोरडी किंवा जाड होणे, मानसिक अस्वस्थता, वंध्यत्व, हृदयविकार, हाडांचे आजार अशी अनेक लक्षणे दिसून येतात. वेळीच निदान न झाल्यास थायरॉईड विकार गुंतागुंतीचे स्वरूप धारण करतो. विशेषतः महिलांमध्ये त्याचे प्रमाण जास्त असून, गरोदरपणात आई व बाळ दोघांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. आयोडीनची कमतरता, औषधांचे दुष्परिणाम, व्यायामाचा अभाव आणि आधुनिक जीवनशैली ही यामागील प्रमुख कारणे आहेत. थायरॉईड आजाराचे वेळीच निदान झाले नाही तर भविष्यात होणाऱ्या गुंतागुंती टाळणे कठीण होते. त्यामुळे मोफत चाचण्या उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. जर तुम्हाला ही लक्षणे दिसत असतील तर या अभियानात मोफत थायरॉईड तपासणी करून घ्यावी, असे आवाहन डॉ. सेठिया यांनी केले आहे.




बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे साहेब यांच्या वतीने समाज कल्याण मंत्री तथा छत्रपती संभाजीनगर पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल मा. ना. संजयजी शिरसाट साहेब यांचा भव्य नागरी सत्कार माजलगाव मोंढा मैदानावर दि २४/५/२५ रोजी आयोजित करण्यात आला त्या कार्यक्रमात सहभागी होऊन राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने मा.ना.संजयजी सिरसाट साहेब सामाजिक न्याय मंत्री तथा छ. संभाजीनगर पालकमंत्री यांचा सत्कार करुन महाराष्ट्रातील चर्मकार समाजाच्या संत रविदास चर्मोद्योग विकास महामंडळातील आडी अडचणी संदर्भात विविध मागण्या चे निवेदन देण्यात आले त्यावेळी जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके , युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव , जिल्हा सचिव ऑड दत्ता जाधव, जिल्हा उपाध्यक्ष बालासाहेब गवळी, जिल्हा संघटक राधाकीसन भाळशंकर, माजी कर्मचारी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर, माजी कार्याध्यक्ष सत्यनारायण उनवणे, तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे, कर्मचारी तालुकाध्यक्ष सिताराम सोनवणे, राजू भैय्या शिंदे, युवा तालुकाध्यक्ष आकाश कांबळे, तालुका उपाध्यक्ष अर्जुन पोहेकर, शहर अध्यक्ष प्रसाद वाघमोडे, शहर उपाध्यक्ष संतोष खंडागळे, शहर सचिव मनोज वाघमारे, वसंत वाघमारे, संतोष जाधव, नारायण पोहेकर, मयूर वाघमारे, ज्ञानेश्वर लोकरे इ.

## सकल ब्राह्मण समाज बांधव यांच्यावतीने विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार समारंभ आ.सुरेश धस हास्ते संपन्न

पाटोदा ।प्रतिनिधी

पाटोदा येथे सकल ब्राह्मण समाज बांधव यांच्यावतीने विविध परीक्षांमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंतांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यास आमदार सुरेश धस यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत कौतुक केले. यामध्ये कु. ऋचा विठ्ठल कुलकर्णी यांची एमपीएससी मार्फत जे.एम. एफ.सी परीक्षेत दिवाणी न्यायाधीश क –स्तर प्रथम वर्ग न्यायादांडाधिकारी पदी निवड झाली. तसेच कु. मृणाली मिलिंद कुलकर्णी यांची एसबीआय असिस्टंट मॅनेजर बँक ऑफ इंडिया सुपर क्लास–१ पदी नियुक्त झाली.

ऋचाने बीड येथे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण केले. सर्वसामान्य



कुटुंबात येऊन तिने वडिलांच्या कष्टाचे चीज केले. तसेच अथक परिश्रमाने आणि जिद्दीने यश संपादन केले. विशेष म्हणजे ऋचा या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या पहिल्या १० विद्यार्थ्यांपैकी एकमेव मुलगी आहे. तिने मिळवलेले यश हे सर्वसामान्य कुटुंबातील उच्च ध्येय बाळगणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि विशेषतः मुलींसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.आसे आमू सुरेश धस यांनी म्हटले याशिवाय मृणाली देखील सर्वसामान्य कुटुंबात येऊन काम करून यशस्वी झाली आहे. या दोघींचा सत्कार करून धस यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मंचावर नगराध्यक्ष पांडूताई, कीर्ती ताई टेकाळे, अभय जोशी साहेब, नगराध्यक्ष दिपाली ताई राजेंद्र जाधव प्रथम नगराध्यक्ष बळीरामजी पोटे,अँन्ड जब्बार पठाण अँन्ड सचिन जवळे स्वकीय साहाय्यक सोमीनाथ कोल्हे,आयांच्यासह नगरपंचायत पाटोदाचे सर्व नगरसेवक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच आयोजक, पत्रकार महेश बेदरे, इंजिनिअर किरण देशमुख, प्रशांत देशमुख काका, पत्रकार अजय जोशी, पत्रकार सुधीर एकबोटे, गणेश पांडव, पत्रकार विजय जोशी, विशाल देशमुख श्रीकांत धसे या सर्वांचे कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल सर्व समाज बंधवाचे धस यांनी आभार मानले .या कार्यक्रमस सर्व नगरसेवक पत्रकार वकील बंधव यावेळी उपस्थित होते

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी जागा द्या

### मातंग समाजाचे नेते अनिल राधे कांबळे यांची ना. सिरसाट यांचेकडे मागणी

माजलगाव ।प्रतिनिधी

साहित्यशोधक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी माजलगावात जागा द्या अशी मागणी ब्रह्मगावचे उपसरपंच तथा मातंग समाजाचे युवा नेते अनिल राधे कांबळे यांनी सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्याकडे निवेदनाद्वारे दि. २४ मे रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक, समाजसुधारक आणि लोकशाहीचे कट्टर समर्थक अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने तसेच त्यांच्या साहित्यातून आणि विचारातून अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळाली आहे. आणि त्यांचे योगदान समाजाच्या प्रबोधनासाठी अतुलनीय आहे.त्यामुळे आपल्या नेतृत्वात अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारणीसाठी माजलगाव



येथे योग्य जागा निश्चित करण्यात यावी आणि आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात यावा. या स्मारकाच्या माध्यमातून नागरीकांना त्यांच्या जीवनकार्याची ओळख होईल व तरूणांना त्यांच्या विचारांपासून प्रेरणा मिळेल.

अशी मागणी करण्यात आली यावेळी मातंग समाजाचे युवा नेते अनिल राधे कांबळे, मनोज वाघमारे, ईश्वर येवले, राम घोडके, विकास शेरकर, पप्पू बाबर, आकाश कारके, श्याम कांबळे, विक्रांत कांबळे, संकेत कांबळे, प्रशांत कांबळे, युवराज कांबळे, प्रवीन कांबळे, शरद कांबळे, सागर कांबळे,अविनाश कांबळे, दत्ता कांबळे यांचे सह समाज बांधव वर्ग उपस्थित होता.

## महामानवाच्या जयंती निमित्त केले २९ रक्त दात्यांनी रक्तदान,संघर्ष युवाग्रुपचा स्तुत्य उपक्रम

केज/ प्रतिनिधी

केज तालुक्यातील मौजे नायगाव येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी राहुल खोडसे यांनी संघर्ष युवा ग्रुपच्या माध्यमातून प्रतिवर्षी महामानवांच्या जयंती निमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवत असतात.तसेच रक्तदान शिबिर ही आयोजित करतात. त्याच प्रमाणे याही वर्षी संघर्ष युवा ग्रुपच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती संभाजी महाराज,महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या संयुक्त जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय रुग्णालय यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते.या शिबिरात तब्बल २९ रक्तदात्यांनी रक्तदान करत सामाजिक बांधिलकी जपत आगळी वेगळी जयंती



साजरी केली. यामध्ये तरुणांनी विशेष सहभाग नोंदवला होता.

यावेळी राहुल खोडसे, सूरज खोडसे,प्रवीण खोडसे,उमेश खोडसे, सोमनाथ गुजर,अजय मुळूक,सुरेश खोडसे, ऋतुराज खोडसे, धम्मपाल होके,रत्नदीप खोडसे,शुभम गुजर, शंकर सोमवंशी,अमोल खोडसे,मिलिंद खोडसे, विश्वजित खोडसे, दशरथ खोडसे,मनोज गुजर,अशोक महामुनी, गोविंद सोमवंशी, पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांच्यासह गावातील,नागरिक, तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.नायगाव ग्रामस्थांनी या उपक्रमा चे स्वागत केले आहे.



आष्टी येथील सुप्रसिद्ध शार्प स्टेशनरी चे मालक श्री. युसुफ शेठ तांबोळी यांच्या मुलीच्या शुभविवाह (युग लॉन्स, आष्टा फाटा) प्रसंगी तांबोळी कुटुंबास शुभेच्छा देतांना श्री. राजेंद्र लाड सर, मार्केटिंग चे एम. डी. श्री. अजित डिसले साहेब दिसत आहेत.

## माजलगाव शहरात घाणेचे साम्राज्य, नगरपरिषदेचा कारभार भगवान भरोसे

माजलगाव – माजलगाव नगरपरिषद वेगवेगळ्या कारणांने गाजत असते हयात ओपन स्पेस (शासकीय आरक्षित जागा) ची विक्री करणारे अधिकारी,कर्मचारींवर झालेले गुन्हे,बोगस सिमेंट रस्तेतील भ्रष्टाचार,नाले , अस्वच्छता, अधिकारी व कर्मचाऱ्यांना अंकुश नसल्यामुळे नगरपरिषद प्रशासनाची मर्यादा उघड पडतं आहे त्यामुळे नगरपरिषदची प्रतिमा मलिम झाल्यामुळे शहरात उलट सुलट चर्चेला उत येत आहे ह्याला पुर्णपणे जिम्मेदार मुख्याधिकारी असुन ह्यांच्या कारभाराविषयी विरोध दर्शविण्यात येत आहे ह्यामुळे माजलगाव नगरपरिषद चे मुख्याधिकारी यांची तात्काळ बदली करावे अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी केली आहे.माजलगाव शहरात घाणेचे साम्राज्य पसरले असुन पावसाने शहरातील मुख्य रस्त्यांवरील नाल्या साफ न केल्यामुळेच नाल्या भरभरून वाहत असल्यामुळे सामान्य नागरिक,व्यापारी वर्ग चिंताग्रस्त झाले आहे तसेच घरातील घाण कचरा उचलण्यासाठी घंटागाडी दररोज सकाळी न येता सात,आठ दिवसाला एकदा येत आहे व प्रत्येक वार्डातील नाल्या पंधरा पंधरा दिवस साफ न केल्यामुळे रोगराई पसरत असुन सामान्य नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे त्यामुळे माजलगाव नगरपरिषदेचा वाली कुणी आहे का नाही ?असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडतं आहे.

माजलगाव नगरपरिषद मधील कारभार भगवान भरोसे चालु असुन माजलगाव नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांची तात्काळ बदली करावे व जिल्हाधिकारी साहेबांनी माजलगाव नगरपरिषद मधील कारभारावर लक्ष देण्याची गरज आहे अशी प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ता शेख रशिद यांनी दिली आहे.

## वै.संत मदन महाराज बिहाणी म्हणजे त्याग,भक्ती व वैराग्याचा संगम – ह.भ.प.बबन महाराज बहिरवाल

आष्टी ।प्रतिनिधी

४० वर्षापूर्वी सासु व सुना, मालक व गडी यांच्यात काय व कसे नाते होते आणि आज यांच्यात कसे नाते आहे. पुर्वी भजन कीर्तनास गर्दी नसे आज कीर्तनात बसायला जागा मिळत नाही. एकूणच आध्यात्मिक प्रचंड प्रेम निर्माण करत त्याविषयी गोडी निर्माण करण्याचे अध्यात्मिक कार्य वै. संत मदन महाराज यांनी केलेले आहे असे प्रतिपादन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार आणि समाज प्रबोधनकार ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल यांनी केले.

आष्टी तालुक्यातील घाटा पिंपरी येथे वै. संत मदन महाराज बिहाणी यांनी प्रारंभीत केलेल्या ५६ व्या. अखंड हरिनाम सप्ताहातील काल्याचे कीर्तनप्रसंगी ते बोलत होते. सप्ताहात सात दिवस ह. भ. प. संतोष महाराज मोरे यांच्या मधुर वाणीतुन संत तुकाराम महाराज जीवन चरित्र संगीत कथा झाली.

काल्याचे कीर्तन प्रसंगी यशभैय्या आजबे, ह. भ. प. निवृत्ती महाराज बोडखे, संतोष महाराज मोरे, मोहन महाराज आमटे, कोल्हे महाराज, भागचंद झांजे, माजी चेअरमन संजय गाढवे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, बाळासाहेब पिसाळ, सेवानिवृत पोलीस अधिकारी विठ्ठलराव नरवडे, संतोष मुटके सर, पवार महाराज, पांडुतात्या झिंजुर्के, शिवाजी धोंडे, अशोक देसाई महाराज, पाटील महाराज, संपत दानवे, हंसराज मगर, अनिकेत चांगुणे, देवीदास कुटे, कृष्णा महाराज बहिरवाल, बबन मगर, माणिकराव मुळीक, अशोक तळेकर, बाबासाहेब मुळीक सर, शामआबा तळेकर, बबन रांजने, अंकुश तळेकर, प्रेम पवळ, एम. बी. तळेकर आदि राजकीय, सामाजिक, धार्मिक, क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. काल्याचे प्रसादाची पंगत बाबासाहेब मुळीक, अशोक कोकरे, आमोल मुळीक, सतिष मुटके, श्रीकांत झांजे, परसराम तळेकर, विकास मुळीक, महादेव झांजे, संतोष तळेकर या जणांनी दिली.

ह. भ. प. बबन महाराज पुढे म्हणाले की, वै. संत मदन महाराज यांच्या हिमालया एवढ्या अध्यात्मिक कार्याचे कौतुक करताना घाटा पिंपरी येथील काल्याचे कीर्तनात हजारो भाविक भक्तांच्या समोर आध्यात्मिक कार्याचे चिंतन आणि संत सज्जनांचे विचार पेरताना ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल कीर्तनातील अभंगाचे समयोचित निरूपण करीत होते. प्रारंभी वै. संत मदन महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून नतमस्तक होत आशीर्वाद घेण्यात आले. ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल पुढे म्हणाले, संत मदन महाराज यांच्या रुपाने हिमालयाच्या उंचीचा महात्मा आपल्या परिसरात फिरलेला आहे. महाराष्ट्राचे दुदैव आहे की महात्मा, संत भक्त जीवंत असेपर्यत कळत नाही ते गेल्यावर कळतात. वै. संत मदन महाराज यांचा विषय तो झाला नारायण असे त्यांचे झाले होते. भगवंताच्या आश्रयाला जाणाऱ्याचे बंधन गळुन पडते, असेही महाराज म्हणाले. वै. संत मदन महाराजांच्या बालपणीच्या अनेक आठवणींना त्यांनी यावेळी उजाळा दिला. ते म्हणाले की, वै. संत मदन महाराजांच्या लहानपणीच आईवडील देवाघरी गेले. संत मदन महाराजांवर दु:खाचा डोंगर कोसळला नंतर संत मदन महाराजांनी विरक्तवृत्तीने घरादाराचा नातेवाईकांचा त्याग करून श्री क्षेत्र पंढरीस जाऊन त्यांनी श्रीसंत भगवान शास्त्री धारूरकर, श्रीसंत गोपाळशास्त्री गोरे, श्रीसंत सद्गुरू कृष्णदास लोहिया, श्रीसंत धुंडा महाराज देगलुरकर यांचे सत्संगात राहून त्यांची अनेक वर्ष सेवा केली. पंढरीत श्रीसंत कृष्णदास लोहिया महाराजांकडून त्यांनी ज्ञान घेवुन लोहिया



महाराजांनी पंढरपुर येथे चालविलेल्या अन्नछत्र कामात संत मदन महाराज यांनी मदत केली. संत मदन महाराजांनी अन्नदानाची महती लोहिया महाराजांकडून जाणून घेतल्यानंतर श्रीक्षेत्र पंढरीत मदन महाराजांनीही अन्नछत्र सुरू केले. संत मदन महाराजांनी पंढरीत चातुर्मासात गोरगरीब वारकऱ्यांसाठी राहण्याची सोय केली. अन्नदान, ज्यांना कपडे नसतील त्यांना कपडे; पैसे वाटत करीत असत. वारक–यांना महाराजांनी धोतर मागुन ही त्यांचे शिष्य आनंदा महाराजांना धोतर देण्याचे सांगितले. हरिभाऊ पाटील महाराज म्हणाले कपडे संपलेत. हे ऐकुण मदन महाराज उठले न अंगावरील नवे धोतर फेडुन पंचा नेसले आणि त्या वारकऱ्यास धोतर दिले असे हे संत मदन महाराज वैराग्याचे महामेरू होते. त्यांचे कर्णासारखे औदार्य त्यांचेकडे होते. श्रीसंत मदन महाराजांची साधी राहणी, संत विचार, स्वभाव काटकसरीचा होता. आपल्या शरीरावर कपडे घालण्यातही ते काटकसर करीत असत. साधे धोतर, अंगावर पंचा, फक्त कीर्तनाचे वेळी अंगात सदरा, डोक्याला फेटा बांधीत, त्यांनी देहाची कधीही तमा बाळगली नाही. श्रीसंत मदन महाराजांनी आयुष्यात प्रामुख्याने दोन कामे केली. एक अन्नदान दुसरे हरिनाम, वै. संत मदन महाराज भक्ती, ज्ञान, वैराग्याचे संगम होते. पहाटे उठून रात्री १२ वाजेपर्यंत ते सतत परमार्थ करीत. महाराज पायी चालत असुन किंवा बैलगाडीत असोत किंवा बसमध्ये असोत ते अखंड नामस्मरणातच असत. संत मदन महाराजांची अवस्था जागृती, स्वप्नी पांडुरंगच होती. संत मदन महाराजांनी परमार्थात कधीही तडजोड केली नाही. वैराग्याचे महामेरू संत मदन महाराजांनी स्वत:च्या अंगावर कपडे न घालता समाजाला मायेची भक्तीची ऊब दिली. संत मदन महाराज हा वृक्ष भक्तीच्या फळाने लवुन गेलेला होता. संत मदन महाराजांचे अंत:करण अपार कारूण्याने, अथांग प्रितीने डबडबलेले होते. संत मदन महाराज भक्तीने वाहणारी गंगा होती. श्रीसंत मदन महाराजांचे चरित्र शब्दांकित करणे शक्य नाही. महाराज एवढे महान होते. ते त्यांचे मोजमाप करताच येणार नाही.

## मान्सूनने राज्यात लावली लवकरच हजेरी,यंदा सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज

### शेती मशागती साठी वेळ अपुरा

केज/प्रतिनिधी

राज्यातील नागरिक ज्या मान्सूनच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत होती,तो आज अखेर महाराष्ट्रात दाखल झाला आहे. भारतीय हवामान विभागाने रविवारी सकाळी अधिकृत घोषणा करत मान्सूनचे महाराष्ट्रातील आगमन जाहीर केले.विशेष म्हणजे यंदा मान्सून नेहमीपेक्षा तब्बल १० ते १२ दिवस आधीच राज्यात पोहोचला असून यामुळे शेतकरी वर्गात उत्साहाचे वातावरण आहे.परंतु शेतीची मशागत करण्यासाठी पुरेसा वेळ न मिळाल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहे.दि.१५ मे पासून महाराष्ट्रात सतत पाऊस पडत असल्याने शेती मशागती साठी वेळच मिळाला नाही.

सामान्यतः दि.७ जून ला मृग नक्षत्र लागण्याच्या सुमारास राज्यात मान्सून दाखल होत असतो.मात्रयावर्षी केरळात शनिवारी दाखल झालेला मान्सून केवळ काही तासांतच महाराष्ट्रातही पोहोचला आहे.हवामान खात्याच्या माहिती नुसार



यामागे बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्टा निर्माण झाल्यामुळे पोषक हवामान स्थिती निर्माण झाली आहे.

हवामान विभागाने यंदा सरासरीपेक्षा अधिक पावसाचा अंदाज वर्तवला आहे.त्यामुळे कृषी क्षेत्रासह जल साठ्यांमध्ये भर पडण्याची शक्यता असून,पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात सुटेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.मान्सूनच्या या वेळेपूर्वीच्या आगमनामुळे खरीप हंगामाची तयारी लवकरच करावी लागणार होती.आता शेतकऱ्यांना पेरणीसाठी अनुकूल कालावधी मिळणार आहे.राज्य भरातील ग्रामीण भागातही यामुळे आनंदाचे वातावरण पसरले आहे.राज्य सरकार व कृषी विभागाने शेतकऱ्यांना आवश्यक मार्गदर्शन व साधनांची पूर्तता करण्यासाठी तयारी सुरू केली असल्याची माहितीही अधिकृत सूत्रांनी दिली आहे. दरम्यान आभाळ भरून येत असल्याने व सतत पाऊस पडत असल्याने मशागत कशी व कधी करावी असा यक्ष प्रश्न शेतकऱ्यांना पडलेला आहे.

